दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९५ | शनिवार दि.२१ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### युद्धाचे ढग अधिक गडद

मध्यपूर्वेत पुन्हा युद्धाचा भडका उडणार, असे चिन्ह दिसू लागले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाद शिगेला पोहचला असून त्याचे पर्यवसान सशस्त्र संघर्षात आणि त्यानंतर युद्धात होईल, अशी स्थिती आहे. गेल्या वर्षी अमेरिकेने इराणच्या युरेनियम संपृक्तीकरण केंद्रांवर वायुहल्ले चढविले होते. इराणचा अण्वस्त्र निर्मिती कार्यक्रम या हल्ल्यांमुळे काही वर्षे मागे गेला आहे, असे अमेरिकेचे म्हणणे होते. तर इराणने आपल्या आण्विक केंद्रांची काहीही हानी झाली नसल्याचा दावा केला होता. तो अल्पकालीन संघर्ष ही मोठ्या युद्धाची नांदी आहे, असे भाकित त्यावेळी अनेक तज्ज्ञांनी केले होते.

# कृषी क्षेत्राच्या विकासासाठी एआयच्या सहाय्याने प्रभावी उपाययोजना शक्य

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे एआय समिटमध्ये प्रतिपादन; जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या महाॲग्री एआय धोरणाचा परिचय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**कृषी क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे सांगितले. आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचण्याची गरजही मुख्यमंत्र्यांनी प्रतिपादित केली.**




नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट –२०२६ मधील एआय इन ॲग्रिकल्चर या विषयावरील चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री नितेश राणे यांची उपस्थिती होती. चर्चासत्रात मुख्य सचिव राजेशकुमार अगरवाल, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव देवेश चतुर्वेदी, कृषि सचिव विकासचंद्र रस्तोगी, एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, जागतिक बँकेच्या दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष जोहॅन्स झुट, एकस्टेप फाउंडेशनचे सह–संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शंकर मरुवाडा सहभागी झाले होते. नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठीभारत सरकार, जागतिक संशोधन संस्था, गुंतवणूकदार यांच्याशी महाराष्ट्र सरकार सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षिततेवर ताण आला आहे. अनिश्चित वातावरण, घसरणारी पाणी पातळी, जमिनीचा खालावणारा दर्जा, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक मार्केटमधील अनिश्चितता यांचा या आव्हानांमध्ये समावेश आहे. अशा परिस्थितीत आर्टीफिशीअल इंटेलिजन्स महत्वाची भूमिका पार पाडू शकते, असे सांगून ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### बंडखोरी करणाऱ्यांवर कारवाई – रविंद्र चव्हाण

भिवंडी :भिवंडी निजामपूर महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या पक्षादेशा (व्हीप) विरोधात बंडखोरी करणाऱ्या नारायण चौधरी आणि त्यांच्याबरोबरच्या नगरसेवकांवर कारवाई केली जाणार असल्याची घोषणा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी केली. रविंद्र चव्हाण म्हणाले की, महापौरपदासाठी भिवंडीच्या स्थानिक समितीकडून बहुमताने नारायण चौधरी यांचे नाव पाठविण्यात आले होते. त्यानुसार पक्षाकडून नारायण चौधरी यांना उमेदवारी अर्ज भरण्यास सांगण्यात आले होते. मात्र बऱ्याच चर्चेअंती अखेर स्थानिक पातळीवर कुठल्याही स्वरुपाचे वाद टाळण्यासाठी भाजपा प्रदेश स्तरावर स्नेहा पाटील यांना पक्षाच्या महापौरपदाच्या उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले.

### 'गोकुळ' कडून दूध दरात वाढ

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ म्हणजेच गोकुळने म्हशीच्या दूध खरेदी दरात १ रुपया आणि गाय दूध खरेदी दरात २ रूपये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवारी (दि. २० फेब्रुवारी) झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. म्हैस दूध खरेदी दर ६.० फॅट आणि ९.० एस.एन.एफसाठी प्रतिलिटर रुपये ५२.५० रुपयांवरून ५३.५० रुपये करण्यात आला आहे. तर गाय दूध खरेदी दर ३.५ फॅट आणि ८.५ एस.एन.एफसाठी प्रतिलिटर ३४ रूपयांवरून ३६ रूपये केला आहे. या दरवाढीमुळे गोकुळच्या म्हैस आणि गाय दूध उत्पादक शेतकऱ्यांना महिन्याकाठी जादाचा दर मिळेल. हे नवे दर २१ फेब्रुवारीपासून लागू होतील, असे गोकुळकडून सांगण्यात आले आहे. या दूध खरेदी दर वाढीचा सुमारे ५ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

### 'एआय समीट'मध्ये युवक काँग्रेसचे आंदोलन

नवी दिल्ली : राजधानी नवी दिल्लीत सुरू असलेल्या एआय समिटमध्ये शुक्रवारी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घुसखोरी करत तीव्र आंदोलन केले. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षा व्यवस्था तोडत प्रगती मैदानावरील भारत मंडपम येथे सुरू असलेल्या या एआय समिटमध्ये प्रवेश केला. त्यानंतर देशविदेशातील पाहुण्यांसमोर शर्ट काढत पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी पीएम इज कॉम्प्रमाईज्ड अशा घोषणा युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिल्या. एआय समिटमध्ये कार्यक्रमांसाठी देश–विदेशातून आलेले अनेक दिग्गज आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी भारत मंडपमध्ये उपस्थित होते. त्यावेळी युवक काँग्रेसचे काही कार्यकर्ते फलक घेऊन कार्यक्रमाच्या मुख्य ठिकाणी पोहोचले. सुरक्षा रक्षकांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, युवक काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी आपले कपडे काढत घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. पीएम इज कॉम्प्रमाईज्ड अशा घोषणा युवक काँग्रेसचे हे कार्यकर्ते देत होते. दरम्यान, सुरक्षा रक्षकांनी या कार्यकर्त्यांना पकडून ताब्यात घेतले आणि तातडीने कार्यक्रम परिसरातून बाहेर काढले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२२.५० क्विंटल | २,०५१ | २,८७० | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९७.५० क्विंटल | ३४० | ४,६०० | ३,३३६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०२.०० क्विंटल | ६,४०० | ७,८८० | ७,४९३ |
| उडीद : २४.०० क्विंटल | ६,४०१ | ६,४१५ | ६,४१० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,०६० | ३,१३३ | २,७१५ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ३९.५० क्विंटल | ५,२०० | ५,३०० | ५,२५० |
| हरभरा: ३२.०० क्विंटल | ५,००० | ५,०८० | ५,०२९ |

# परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे लाच प्रकरणात अडकले

## सालंसी प्रमाणपत्रासाठी ५० हजारांची मागणी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी येथील वादग्रस्त तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांचे नाव लाच प्रकरणात समोर आल्याने महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. सालंसी (ऐपतीचे) प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदाराकडून तब्बल ५० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार बीड लाचलुचपत प्रतिबंधक



विभागाकडे करण्यात आली होती. या तक्रारीनंतर एसीबीने तात्काळ सापळा रचत कारवाई केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, तडजोडीनंतर २० हजार रुपयांवर व्यवहार ठरल्याची माहिती ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्र शासनाच्या मुस्लिम आरक्षण रद्द निर्णयाविरोधात न्यायालयात आव्हान

मुंबई । प्रतिनिधी

मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महाराष्ट्र सरकारने अलिकडेच घेतलेल्या निर्णयामुळे एक नवीन कायदेशीर आणि राजकीय वाद निर्माण झाला आहे. राज्य सरकारने मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम समुदायासाठीचा कोटा रद्द करण्याचा सरकारी निर्णय जारी केला. या निर्णयाला आता मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले




आहे. ज्याने सरकारच्या या निर्णयाला असंवैधानिक आणि सांप्रदायिकदृष्ट्या प्रेरित म्हटले आहे.

याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की, हा निर्णय केवळ लोकशाही मूल्यांच्या विरोधात नाही तर एका मोठ्या समुदायाला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून मागे ढकलतो. २०१४ पासून हा वाद सुरू आहे, जेव्हा तत्कालीन काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने एका अध्यादेशाद्वारे ''विशेष मागासवर्ग'' श्रेणी अंतर्गत मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिम समुदायाला ५ टक्के आरक्षण दिले. मुंबई उच्च न्यायालयाने नंतर मराठा आरक्षण रद्द केले, परंतु शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम आरक्षण अंशतः कायम ठेवले. सध्याच्या महायुती सरकारचा ◀◀ पान २ वर

# अमेरिकेपुढे मोदिंनी शेतकऱ्यांचा बळी का दिला ? राहुल गांधी यांचा सवाल

**दिल्ली । वृत्तसेवा**

**भारत–अमेरिका व्यापार करारावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. अमेरिकन लोकांना खूश करण्यासाठी आपल्या शेतकऱ्यांचा बळी का देण्यात आला?, असे अनेक सवाल त्यांनी केले आहेत.**

गांधी यांनी याबाबत शुक्रवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक



पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी भारत–अमेरिका करारावरुन संसदेत केलेल्या भाषणात जिउ–जित्सूचे उदाहरण का दिले? यावर त्यांनी भाष्य केले आहे. कारण त्या खेळात एखाद्याला पकडून अथवा दबावतंत्राचा अबलंब करुन नियंत्रण मिळवले जाते. यावर त्यांचे म्हणणे आहे की, राजकारणातदेखील असा दबाव आणला जातो, पण तो बाहेरून दिसत नाही. या करारासाठी आपल्या देशातील शेतकऱ्यांचा बळी का दिला?, अमेरिकेला आमच्या तेल आयातीबाबत निर्णय घेण्याची मूभा देऊन भारताच्या ऊर्जा सुरक्षेशी तडजोड का केली?, कोणत्याही परस्पर आश्वासनांविना अमेरिकेची आयात दरवर्षी १०० अब्ज डॉलर्सने वाढवण्यावर ◀◀ पान २ वर

# 'लाडकी बहीण' योजनेत ८६ लाख महिलांना डच्चू !

## डिसेंबरमध्ये केवळ १ कोटी ६० लाख महिलांच्याच खात्यात रक्कम

**मुंबई । प्रतिनिधी**



महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. डिसेंबर २०२५ च्या हप्त्यात तब्बल ८६ लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मागील वर्षापर्यंत या योजनेचा लाभ सुमारे २ कोटी ४० लाख महिला घेत होत्या. मात्र डिसेंबर महिन्यात केवळ १ कोटी ६० लाख महिलांच्या खात्यातच रक्कम जमा झाली.

सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत २ कोटी ४० लाख लाभार्थ्यांपैकी १ कोटी ९० लाख महिलांनी ई–केवायसी पूर्ण केली. पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या १ कोटी ६० लाख महिलांनाच डिसेंबरचा १५०० रुपयांचा हप्ता देण्यात आला. उर्वरित सुमारे ८६ लाख महिलांना विविध कारणांमुळे लाभ मिळू शकला नाही. सरकारने स्पष्ट केले आहे की, अर्जामध्ये त्रुटी आढळल्यास ३१ मार्च २०२६ पर्यंत ई–केवायसी मध्ये दुरुस्ती करण्याची संधी दिली आहे. तसेच कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी नोकरीत असल्यास संबंधित महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. दरम्यान, जानेवारी २०२६ चा हप्ता अद्याप वितरित झालेला नाही. सामाजिक न्याय विभागाकडून निधी वितरणास ◀◀ पान २ वर

# बारामतीत आता अतिरिक्त जिल्हाधिकारी राज्य सरकारकडून प्रस्तावास मान्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि प्रशासकीय यंत्रणेवरील वाढता ताण पाहता पुणे जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी पद निर्माण करण्याच्या प्रस्तावाला सरकारने मान्यता दिली आहे. पुण्यात दोन ठिकाणी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव असताना केवळ एकच बारामती येथेच पदनिर्मितीला सरकारने मान्यता दिली. त्यामुळे आंबेगावला दुसरे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद देण्याऐवजी चाकण येथे गर्दीच्या आणि वर्दळीच्या भागासाठी अपर तहसील कार्यालय निर्माण करण्यात आले आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांचा विस्तार



झाला आहे. प्रशासकीय कामांवरचा ताणही वाढला आहे. जिल्ह्यांचे भौगोलिक क्षेत्राबरोबर लोकसंख्याही वाढली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना अंतर वाढलेले आहे. त्यामुळे राज्यात अपर जिल्हाधिकाऱ्यांची ११ पदे निर्माण करण्यात यावीत, अशी एका ◀◀ पान २ वर

# फुटबॉल खेळताना खासदाराचे निधन

**शिलांग । वृत्तसेवा**

मेघालयातील 'वॉईस ऑफ द पीपल पार्टी'चे लोकप्रिय नेते आणि शिलांगचे विद्यमान खासदार डॉ. रिकी एजे सिंग्कोन यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. फुटबॉल खेळत असताना ही दुर्दैवी घटना घडली. एका उमद्या आणि लोकसभेतील अभ्यासू नेत्याच्या अचानक जाण्याने संपूर्ण राज्यात आणि राजकीय वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे. डॉ. रिकी सिंग्कोन हे मावलाई मावियोंग येथील मैदानावर मित्रांसोबत ◀◀ पान २ वर

# एकल मातांना पूर्ण पालकत्वाचा अधिकार

## मुलीच्या दाखल्यातून वडिलांचे नाव आणि जात हटवण्याचा उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक आदेश




**संभाजीनगर । प्रतिनिधी**

एकल मातांना ''पूर्ण पालक'' म्हणून मान्यता देणे ही कोणतीही दया नसून तो संविधानिक अधिकार आहे, असे ठोस निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ यांनी ऐतिहासिक निर्णय दिला आहे. अल्पवयीन मुलीच्या शालेय नोंदीतून वडिलांचे नाव आणि त्यांची जात वगळण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

हे प्रकरण एका अल्पवयीन मुलीशी संबंधित असून, तिची प्रत्यक्ष देखभाल आईकडून होत आहे. मात्र, शालेय दाखल्यामध्ये वडिलांचे नाव आणि त्यांची जात नोंद करण्यात आली होती. याविरोधात आईने न्यायालयात याचिका ◀◀ पान २ वर



अग्रलेख

# युद्धाचे ढग अधिक गडद

मध्यपूर्वेत पुन्हा युद्धाचा भडका उडणार, असे चिन्ह दिसू लागले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाद शिगेला पोहचला असून त्याचे पर्यवसान सशस्त्र संघर्षात आणि त्यानंतर युद्धात होईल, अशी स्थिती आहे. गेल्या वर्षी अमेरिकेने इराणच्या युरेनियम संपृक्तीकरण केंद्रांवर वायुहल्ले चढविले होते. इराणचा अण्वस्त्र निर्मिती कार्यक्रम या हल्ल्यांमुळे काही वर्षे मागे गेला आहे, असे अमेरिकेचे म्हणणे होते. तर इराणने आपल्या आण्विक केंद्रांची काहीही हानी झाली नसल्याचा दावा केला होता. तो अल्पकालीन संघर्ष ही मोठ्या युद्धाची नांदी आहे, असे भाकित त्यावेळी अनेक तज्ज्ञांनी केले होते. ते खरे ठरेल अशी परिस्थिती निश्चितच आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यातील वादाला गेल्या किमान पाच दशकांचा इतिहास आहे. मुस्लीम जगताचे नेतृत्व करण्याची इराणची महत्वाकांक्षा, या महत्वाकांक्षेला अरब मुस्लीम देशांचा असणारा विरोध, अरब मुस्लीम देशांचे अमेरिकेशी असलेले मैत्रीचे संबंध, इराण आणि इस्त्रायल यांच्यातील उभा दावा, इराणमध्ये नुकतेच तेथील कट्टर धार्मिक प्रशासनाविरोधातील उग्र आंदोलन, हजारो इराणी लोकांच्या हत्या करुन हे आंदोलन चिरडण्याची इराण प्रशासनाची कृती, इराणचा अण्वस्त्र निर्मिती कार्यक्रम असे अनेक पैलू या अमेरिका-इराण संघर्षाला आहेत. यावेळी हा संघर्ष आर किंवा पार अशा स्थितीत आल्याचे दिसून येते. दोन्ही देश एकाचवेळी युद्धासाठी सज्जही होत आहेत आणि एकमेकांशी शांतता चर्चाही करीत आहेत. इराणने आपली अण्वस्त्र निर्मितीची महत्वाकांक्षा सोडून द्यावी, अशी अमेरिकेची मागणी आहे तर इराण अणुकार्यक्रम मागे घेण्यास राजी नाही. उलट, अमेरिकेने इराणवर घातलेले सर्व निर्बंध मागे घ्यावेत, असा इराणचा आग्रह आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील चर्चेला फारसा अर्थ उरलेला नाही. कारण दोन्ही देश त्यांच्या त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे सामोपचाराने तोडगा निघणे अशक्यप्राय बाब मानली जात आहे. दुसऱ्या बाजूला अमेरिकेने इराणच्या आसपास सागरी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर युद्धसामग्री आणि नौदल सज्ज ठेवले आहे, ही सज्जता गेल्या दोन महिन्यांपासून चाललेली आहे. त्यामुळे, चर्चा अयशस्वी झाल्यास इराणला सशस्त्र संघर्षाच्या मार्गाने धडा शिकविण्यास अमेरिका उत्सुक आहे, असे दिसून येते. इराणच्या अण्वस्त्रांचा सर्वात अधिक धोका इस्त्रायलला असल्याने इराणचा जमल्यास कायमचा बंदोबस्त करण्याची इस्त्रायलचीही इच्छा आहे. युद्धाच्या सज्जतेसमवेत भेदनीतीचा उपयोग करुन इराणमधील सध्याचे कट्टर धर्मवादी प्रशासन उलथविण्याचाही अमेरिका आणि इस्त्रायल यांचा प्रयत्न आहे. म्हणूनच, अमेरिकेने इराणमधील आंदोलनाला पाठिंबा घोषित केला होता. पाच दशकांपूर्वी इराणमध्ये अहमद रझा पेहलवी यांची सत्ता होती. या सत्तेचे इस्त्रायलशी संबंध मैत्रीचे होते. कारण त्यावेळी अरब मुस्लीम देशांचे इस्त्रायलशी शत्रुत्व होते. पुढे अमेरिकेशी असलेल्या मैत्रीमुळे म्हणा, किंवा अमेरिकेच्या दबावामुळे म्हणा, अनेक अरब मुस्लीम देशांनी इस्त्रायलला मान्यता दिली. त्याचवेळी इराणमध्ये पेहलवी यांची तुलनेने उदारमतवादी असलेली राजवट उलथविण्यात आली आणि तिचे स्थान सध्याच्या कट्टर आणि धर्मवादी राजवटीने घेतले. त्यावेळी परिस्थितीने उलटे वळण घेतले आणि एकेकाळचा इस्त्रायलचा मित्र असणारा इराण त्याचा हाडवैरी बनला. इतका, की त्याने हमास आणि हिजबुल्ला या दहशतवादी संघटनांना शस्त्रबळ आणि पैसा पुरविला व त्यांना इस्त्रायलविरोधात भडकाविले. तशातच इराणने साधारणत: २५ वर्षांपूर्वी अण्वस्त्रनिर्मिती कार्यक्रम हाती घेतला. हे अणुतंत्रज्ञान त्याला पाकिस्तानने पुरविले असा आरोप आहे. स्वत: पाकिस्ताननेही हे तंत्रज्ञान चोरट्या मार्गानेच मिळविले आहे. आता इराण अण्वस्त्रनिर्मितीच्या अगदी जवळ पोहचला आहे, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. तर अन्य तज्ज्ञांच्या मते इराणला डागण्यायोग्य अण्वस्त्र बनविण्यासाठी अद्याप मोठी मजल मारायची आहे. मात्र, तो देश अण्वस्त्र बनविण्याच्या जवळ पोहचण्याआधीच त्याचा अणुकार्यक्रम उध्वस्त करण्याची आवश्यकता अमेरिका आणि इस्त्रायल या दोन्ही देशांना वाटते. कारण, एकदा का इराणने अण्वस्त्रनिर्मितीस योग्य असे युरेनियम बनविले की त्याच्यावर हल्ला करणे कठीण होणार आहे. कारण, अशा हल्ल्यात या संपृक्त युरेनियम सामग्रीला धक्का लागला, तर त्यातून मोठ्या प्रमाणावर किरणोत्सर्ग होऊन अणुबाँब स्फोटासदृश स्थिती निर्माण होऊ शकते आणि जगासमोर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे इराणची तितकी प्रगती होण्याआधीच त्याचा अणुकार्यक्रम उध्वस्त करण्याची अमेरिकेची इच्छा आणि सज्जताही आहे, असे बोलले जाते. पाकिस्तान जेव्हा अणुबाँब निर्मितीच्या मागे लागला होता, तेव्हा इस्त्रायलने पाकिस्तानचा अणुकार्यकम प्राथमिक अवस्थेत असतानाच उध्वस्त करण्याची योजना सज्ज केली होती. कारण, पाकिस्तानच्या अणुबाँबचाही इस्त्रायलला धोका होता. तथापि, त्यावेळी लांब पल्ल्याची युद्ध विमाने नव्हती. त्यामुळे इस्त्रायलने भारताचे साहाय्य विमानांमध्ये तेल भरण्यासाठी मागितले होते. तथापि, तत्कालीन नेत्या इंदिरा गांधी यांनी ते सहकार्य देण्यास नकार दिला होता आणि त्यामुळे पाकिस्तान अण्वस्त्रधारी देश बनला, असा आरोप अनेक मान्यवरांकडून आजही केला जातो. तो खरा असेल, तर पाकिस्तान अण्वस्त्रधारी होण्यात भारताचेही योगदान आहे, असे म्हणावे लागते. असो. आता इराणच्या संदर्भात अमेरिका आणि इस्त्रायल हे देश नेमके काय करणार, हे येत्या काही दिवसांमध्ये समजेलच. काही वृत्तांच्या अनुसार येत्या तीन दिवसांमध्ये, अर्थात रविवार किंवा सोमवारपासूनच इराणवरील हल्ल्यांना प्रारंभ केला जाईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. ती खरी ठरते का, हे येत्या ७२ तासांमध्ये समजेलच. या संभाव्य युद्धाचे परिणाम काय होतील, त्याविषयीही आत्तापासूनच चर्चा केली जात आहे. तथापि, नेमकी परिस्थिती स्पष्टपणे समोर येण्यास काही कालावधी लागणार असल्याने नंतर परिणामांचे विश्लेषण करण्यास वाव आहे. सध्यातरी युद्धमान स्थिती आहे, हे निश्चित आहे.

# आ. अर्जुनराव खोतकर यांच्या जनता दरबारामध्ये शेतकरी, नागरिकांचे प्रश्न जागेवर सुटले

जालना । प्रतिनिधी

आमदार अर्जुन खोतकर यांच्या जनता दरबारामध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या समोर जालना विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न जागेवरच निकाली काढण्यात आले यामुळे तक्रारदार नागरिकांनी आमदार अर्जुन खोतकर यांचे आभार व्यक्त केले. शासकीय अधिकारी आणि सामान्य जनतेत सुसंवाद साधत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारात जालना मतदार संघातील शेतकरी आणि नागरिकांचे बहुसंख्य प्रश्न जागेवर सुटले. काही प्रश्न आणि समस्या विशिष्ट मुदतीत सुटणार असल्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. दरम्यान, प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असणारे प्रश्न तात्काळ सुटल्याने शेतकरी, नागरिकांनी अत्यंत समाधान व्यक्त करीत, जनता दरबाराचा हा उपक्रम नित्य सुरू ठेवावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

प्रारंभी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, दप्तरदिरंगाई अथवा इतर कारणाने शेतकरी, नागरिकांचे प्रश्न प्रलंबित राहतात. परिणामी शासन, प्रशासन आणि जनतेत सुसंवाद राहत नाही. प्रश्न आणि समस्या सुटत नसल्याने अनेकदा नागरिक संताप व्यक्त करतात. त्यामुळे जिल्हास्तरावरील विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी, प्रमुख अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. यामुळे ''थेट प्रश्न आणि थेट उत्तर'' अशा स्वरूपात जनतेचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

**राज्य सरकारला अहवाल देणार**

*जनता दरबाराच्या माध्यमातून किती प्रश्न सुटले, किती मार्गी लागले आणि कायदेशीर मार्गाने काही प्रश्न किती मुदतीत सुटणार आहेत, याबाबतचा अहवाल आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, त्या त्या खात्याचे मंत्री आणि सचिव यांना देणार आहोत. जनतेचे प्रश्न आणि समस्या शंभर टक्के सुटावेत, यासाठी आपला सतत पाठपुरावा राहणार असल्याचेही यावेळी आमदार खोतकर यांनी आवर्जून सांगितले. निवडून आल्यानंतर आपण विकासकामांचा धडाका लावला आहे. ही कामे करताना नागरिकांनी अनेकदा आपल्या समस्या आणि प्रश्न उपस्थित केले. प्रशासकीय पातळीवर होणारी दिरंगाई,



विलंब आणि तांत्रिक अडचणीमुळे कामे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळेच अधिकारी आणि नागरिक यांच्यात सुसंवाद साधत ''जनता दरबार'' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**नागरिकांच्या प्रश्नांवर जागेवर निर्णय**

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या या जनता दरबारात शेकडो नागरिकांकडून निवेदन आणि तक्रारींचा ढीग लागला. वीज वितरण कंपनी, महसूल विभाग, कृषी विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, पोलीस खाते, आरोग्य विभाग, महानगरपालिका, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे, समाज कल्याण, महिला व बालकल्याण विभाग, कामगार कल्याण विभाग, पाणीपुरवठा अशा सर्व विभागातील प्रश्न सरपंच,ग्राम पंचायत सदस्य, शेतकरी, नागरिक नगरसेवक अशा सर्वांनी बेडरपणे आपले प्रश्न उपस्थित केले. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेत जागेवर प्रश्न सोडविले. तांत्रिक अडचणी अथवा न्यायालयीन अडचणीमुळे प्रलंबित असलेले प्रश्न विशिष्ट मुदतीत कागदपत्रांची पूर्तता करून मार्गी लावण्याचीही ग्वाही यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तसेच काही प्रश्न मंत्रालयीन पातळीवर सुटू शकतात, काही प्रश्नांसाठी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील, नवीन जीआर सुद्धा काढावे लागतील. असे प्रश्न आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, श्रीमती सुनेत्रा पवार यांच्यासह संबंधित मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सोडवू , अशी ठाम ग्वाही आमदार खोतकर यांनी दिली. प्रत्यक्ष जनतेच्या प्रश्नावर आगामी अधिवेशनातही आवाज उठवू असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पूर्ण वेळ देऊन समस्या निराकरणासाठी प्रयत्न केल्याने आ.खोतकर यांनी त्यांना धन्यवाद दिले. या बैठकीस शिवसेनेचे अन्य पदाधिकारी भास्करराव आंबेकर, अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे,

आदी उपस्थित होते. तसेच उपविभागीय महसूल अधिकारी रामदास दौंड, उपविभागी पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, तहसीलदार छाया पवार, प्रकल्प संचालक सुनील पठारे, अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कार्यकारी अभियंता बांधकाम सविता सलगर, कार्यकारी अभियंता महावितरण पेंसलवार, उप अभियंता जि प बांधकाम राजहंस, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, वनपरिक्षेत्र अधिकारी निता फुले, गटविकास अधिकारी संदीप पवार, पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, संतोष साबळे, शेवाळे, उपअभियंता एमआयडीसी महावितरण राऊत राय, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील, तालुका भूमि निरीक्षक श्रीवास्तव, तालुका कृषी अधिकारी राठोड, मनपा अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, बांधकाम अभियंता शेख सऊद, नायब तहसीलदार शैलेश राजमाने, राजेंद्र निहाळ पाटील, उपायुक्त नंदा गायकवाड, मंडळ अधिकारी, तलाठी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, तांत्रिक सहाय्यक, ग्रामसेवक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**बीड : काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंत पवार हे बीडमध्ये आले असता बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करताना शामसुंदर जाधव, रमेश सानप, संभाजी जाधव, ॲड. गणेश मस्के, अमर माने,ॲड. गणेश करांडे, ॲड. विद्याताई गायकवाड,जयप्रकाश आघाव,रामाधान जमले इत्यादी.**

# ९ महिन्यांपूर्वी गहाळ झालेली दोन चाकी गाडी माजलगाव शहर पोलीसांनी शोध घेवुन मुळ मालकाला केली सुपुर्त

माजलगाव । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन माजलगाव शहर हद्दीत मागील सहा महिन्यांपूर्वी शिवाजी महाराज चौक बस स्थानका समोर दृष्टी ऑप्टिकल समोरुन सि.बी शाईन नावाची मोटर सायकल महा २३ ए एम ७७१० दि.०८ मे २०२५ रोजी रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली होती.

ऑप्टिकल मधिल कामगार मुलगा बाहेर गावाहून रात्री उशिरा माजलगाव शहरांमध्ये परतल्यामुळे मुक्कामा साठी दृष्टी ऑप्टिकल समोर मोटर सायकल लाऊन तो ऑप्टिकल मध्ये झोपायला गेला असता रात्री १२:४५ च्या सुमारास बिना नंबर ची चार चाकी गाडी मधुन येऊन शिवाजी महाराज चौक बाजार रोड येथे गाडी उभी केली आणी चार चाकी गाडी मधुन दोन चोरटे आरोपी उतरले दृष्टी ऑप्टिकल समोर उभी असलेली सि.बी शाईन मोटर सायकल चे हँडल लॉक टोडले आणि गाडी डायरेक्ट करुन लंपास केल्याची घटना घडली होती.

त्या वरुन सदर मोटर सायकल गहाळ झाल्याची तक्रारी पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे दाखल झाली होती. तसेच आज कालच्या धावपळीच्या युगामध्ये मोटर सायकल हि जिवणामधे आवश्यक झाली आहे. त्यामुळे मोटर सायकल ही प्रत्यकासाठी महत्वाची आणि गरजेचा विषय ठरलेली आहे. त्यामुळे सदर गहाळ झालेली मोटर सायकल शोध कामी पो.स्टे. स्तरावर विशेष पथकाची नेमणुक करुन मोटर सायकल चा शोध घेवुन संबंधित तक्रारदार व वाहन मालक डॉ.गणेश मस्के यांना गाडी सुपुर्त करुन चावी देतांना माजलगाव शहर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/ रामेश्वर खेत्रे, पत्रकार अजिंक्य वाघमारे उपस्थित होते.

काल दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी माजलगाव शहर पोलिस स्टेशन येथे वाहन मालकाला मोटर सायकल परत केली असुन त्या बाबत डॉ.गणेश मस्के यांनी माजलगाव शहर पोलीसांचे आभार व्यक्त करुन समाधान व्यक्त केले आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनित क़ॉवत, मा.अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/१७९६ रामेश्वर खेत्रे, यांनी केलेली आहे.

## पान १ वरून...

### कृषी क्षेत्राच्या विकासासाठी

फडणवीस म्हणाले, जगातील अनेक देशांसाठी कृषी विषय केवळ आर्थिक विषयाशी निगडीत नाही. कृषी विषय अन्न सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता, आर्थिक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. यामुळे भारताने याबाबत फार पूर्वीच विचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या इंडिया एआय मिशनमध्ये कृषी क्षेत्राचा प्रामुख्याने विचार केला आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर, सेवापुरवठा, समावेशकता यांचा विचार केला गेला आहे. फडणवीस यांनी सांगितले की, भारतातील सुमारे निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. पण यापैकी फार कमी लोकांना बदलते हवामान, शेतीसाठी आवश्यक असणारे निविष्ठाचे दर, शेतमालाचे बाजारभाव, वित्तपुरवठा याबाबतमाहिती उपलब्ध आहे. सध्याच्या व्यवस्थेला गतीने माहिती पुरवण्यात आणि आवश्यक माहिती देण्यात काही मर्यादा आहेत. यावर आर्टीफिशीअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने मात करू शकतो. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स शेतीसाठी आवश्यक असणारी बँकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेजची माहिती देऊ शकते. यामध्ये वातावरणातील बदल, जलसिंचन, खतपुरवठा, बाजारभावातील फेरबदल आणि पुरवठा साखळी याबाबत माहिती देऊ शकते. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स जादूची कांडी नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी एआय माडेल विश्वासार्ह डेटा, सुशासन आणि लोकांशी असलेले उत्तरदायित्व यावर आधारित असायला हवे. विश्वासाशिवाय शेतीशी निगडीत विविध सेवा आपण देऊ शकणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शेतीतील आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती लाखो लोकांपर्यंत पोहोचायला हवे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासनाने महाॲग्री एआय धोरण स्वीकारले आहे. हे धोरण सर्वांसाठी खुले आणि परस्पर समन्वय साधणारे आहे. या धोरणावर आधारित विकसित केलेला मोबाईल प्लँटफॉर्म बहुभाषांमध्ये वैयक्तिक सल्ला देतो, बाजारपेठेतील घडामोडींची माहिती देतो, वातावरणातील बदलाबाबत सूचना देतो आणि अनेक शासकीय योजनांबाबत सल्ला देतो. या सेवेला शेतकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ही बाब शेतकरी आर्टिफिशीअल इंटेलिजन्ससाठी सज्ज आहेत, असे ते म्हणाले. कृषि सचिव विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. तसेच महाराष्ट्र शासन कृषि विभागात राबवित असलेल्या डिजिटल तसेच एआय संबंधित विविध प्रकल्पांची त्यांनी माहिती दिली.

### परळीचे तहसीलदार

पुढे आली आहे. एसीबीकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पथकाने प्राथमिक पडताळणी करून नियोजनबद्ध सापळा रचला. दरम्यान, तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले जात आहे. तरीदेखील एसीबीने आवश्यक पुरावे संकलित केले असून, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. पुढील तपास बीड एसीबीकडून सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे परळी तालुक्यातील महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली असून जिल्हाभर या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे. सामान्य नागरिकांकडून भ्रष्टाचाराविरोधातील या धडक कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व टिकवण्यासाठी अशी कठोर पावले आवश्यक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### महाराष्ट्र शासनाच्या

हा नवीन जीआर प्रभावीपणे तो कायदेशीर दिलासा काढून टाकतो, ज्यामुळे कायदेशीर लढाई आणखी तीव्र होते. १७ फेब्रुवारीच्या सरकारी आदेश (जीआर १८१) रद्द करण्याची मागणी करणारी दिवाणी रिट याचिका (क्रमांक ५०६३/२०२६) मुंबई उच्च न्यायालयात ॲड.डॉ. एजाज अब्बास नक्वी यांनी दाखल केली आहे . याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व वकील नितीन सातपुते करत आहेत. या याचिकेत न्यायालयाला हे ''जातीय'' आणि ''अन्याय्य'' पाऊल तात्काळ थांबवण्याची विनंती करण्यात आली आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता ही याचिका २३ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठासमोर तातडीने सुनावणीसाठी सूचीबद्ध केली जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयावर विरोधी पक्षांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. काँग्रेस पक्षाने याला ''लोकशाहीसाठी हानिकारक'' म्हटले आहे आणि सरकार जाणूनबुजून अल्पसंख्याकांना लक्ष्य करत असल्याचे म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरद पवार गट) देखील या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे.

### अमेरिकेपुढे मोदिंनी

सहमती का दर्शवण्यात आली?, मी असेही का म्हटले की हा करार भारताला डेटा कॉलनी बनवू शकतो?, भारत खूप काही देत असून, त्याबदल्यात त्याला खूप कमी मिळत आहे, अशाप्रकारच्या करारासाठी मोदी कसे तयार झाले? ''या लाजिरवाण्या आत्मसमर्पणाचे उत्तर पंतप्रधानांवर घातलेल्या दबावतंत्रात दडलेले आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. एका बाजूला, त्यांनी व्हिडिओतून दावा केला आहे की, उद्योगपती गौतम अदानी यांच्याविरुद्ध अमेरिकेत खटला सुरू आहे. तसेच एपस्टीन प्रकरण, ज्यातील जवळपास ३० लाख फायली अद्याप सार्वजनिक केलेल्या नाहीत. मोदी, केंद्रीय मंत्री हरदीप पुरी आणि उद्योगपती अनिल अंबानी यांची नावे त्यात आहेत आणि या संबंधित प्रकरणात पंतप्रधानांचे नाव येण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे चीन असल्याचे सांगत, त्यांनी माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्रांचा उल्लेख केला आहे. एका बाजूला सीमेवर चिनी आहेत आणि दुसऱ्या बाजूला अमेरिका आहे. यामुळे आपले पंतप्रधान कोंडीत अडकले आहेत आणि सर्वांना ते दिसत आहे, असा दावा गांधी यांनी केला आहे.

### 'लाडकी बहीण' योजनेत

विलंब होत असल्याची माहिती समोर येत आहे, त्यामुळे महिलांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. ही योजना १८ ते ६५ वर्ष वयोगटातील आणि वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी लागू आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत सुरुवातीला अनेक महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा होऊ लागले होते. मात्र निवडणुकांनंतर मोठ्या प्रमाणावर महिलांना वगळण्यात आल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

### फुटबॉल खेळताना

फुटबॉल खेळत होते. खेळाचा आनंद लुटत असताना अचानक ते जमिनीवर कोसळले. तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी त्यांना तातडीने मावियोंग येथील सार्वजनिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र, दुर्दैवाने त्यावेळी तिथे डॉक्टर उपलब्ध नसल्याने त्यांना तातडीने डॉ. एच. गॉर्डन रॉबर्ट्स रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, परंतु उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

### बारामतीत आता अतिरिक्त

समितीने शिफारस केली होती. त्या समितीच्या शिफारशीनुसार नुकताच राज्य सरकारने त्याला मान्यता दिली. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे पुनर्वसन शाखा, कुळ कायदा, महसूल, अपील शाखा याचे कामकाज चालविले जाते. तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाविरुद्ध अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागता येते. त्यांची सुनावणी घेऊन अंतिम आदेश देण्याचे काम जिल्हाधिकारी करतात. दरम्यान, सरकारने नुकताच निर्णय जाहीर केला आहे. जिल्ह्यात जमीनविषयक खटल्यांचे प्रमाण अधिक असल्याने आता बारामती येथेच अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. बारामती अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत बारामती, इंदापूर, दौंड या तीन तालुक्यांशिवाय अन्य काही तालुक्यांचा समावेश होणार का हे आता पाहावे लागणार आहे. मात्र, आंबेगाव येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाऐवजी चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

### एकल मातांना पूर्ण

दाखल करत मुलीच्या दाखल्यातून वडिलांचे नाव वगळावे तसेच मुलीची जात आईच्या प्रमाणे दुरुस्त करावी, अशी मागणी केली होती. संबंधित महिलेच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की, मुलाची ओळख केवळ पितृसत्तात्मक परंपरेवर आधारित असू शकत नाही. भारतीय संविधान समानता, सन्मान आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान देते. त्यामुळे एकल मातेला पूर्ण पालकत्वाचा अधिकार नाकारणे हे संविधानाच्या मूलतत्त्वांच्या विरोधात ठरते. न्यायालयाने आदेश देताना ठाम भूमिका घेत सांगितले की, पितृसत्तात्मक अडथळे, वंशपरंपरा किंवा जातीचे बंधन यापेक्षा मुलाच्या सन्मानाचा, ओळखीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार अधिक महत्त्वाचा आहे. एकल मातांना पूर्ण पालकत्व देणे हे दान नसून तो त्यांचा मूलभूत हक्क आहे, असा स्पष्ट संदेश या निकालातून देण्यात आला. या निर्णयामुळे एकल माता आणि त्यांच्या मुलांच्या ओळखीच्या हक्कांना न्यायालयीन बळ मिळाले असून, समाजातील रूढीवादी आणि पितृसत्तात्मक मानसिकतेला मोठा धक्का देणारा हा निकाल मानला जात आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### युनिक क्युरियस किड्समध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील युनिक क्युरियस किड्स या प्री-प्रायमरी शाळेमध्ये



छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण शाळा शिवमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने सजलेल्या भव्य रॅलीने झाली. सर्व विद्यार्थ्यांनी शिवकालीन पोशाख परिधान करून शाळेच्या परिसरात जयंती रॅली काढली. ‘‘जय भवानी, जय शिवाजी’’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. चिमुकल्या विद्यार्थिनींनी लाठी-काठीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जयघोष आणि मुजरा सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत वातावरण अधिक जोशपूर्ण केले. कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांचे शौर्य, स्वाभिमान आणि देशप्रेम या गुणांचे महत्त्व सांगितले. हा प्रेरणादायी कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना जागवणारा ठरला.

### मोठेवाडी जि.प.शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः छत्रपती शिवाजी



महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नाथा रासवे हे होते तर ड. नारायण गोले पाटील, लोभाजी भोरजे,मा.सरपंच अविनाश गोंडे,चेअरमण संभाजी चव्हाण, उपसपंच अंगद खेत्री, संभाजी पाष्टे, प्रा.डॉ. बापुराव वराडे, उपाध्यक्ष विलास खेत्री,सखाराम पास्टे, सुदर्शन हिवरकर, अशोक रासवे, वचिष्ट गोंडे,संजय रोकडे,गणेश सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड,नारायण गोले, लोभाजी भोरजे, अविनाश गोंडे, संभाजी पास्टे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सतीश डोणे, आभार गेणु पवार यांनी मानले.विद्यार्थ्यांचे शिवगर्जना, भाषण, गीत सादर केले तसेच चिमुकल्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांची वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे जेष्ठ शिक्षक उत्तम ढवळे,वसंत टाकणखार, शिवाजी व्यवहारे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## राज्यस्तरीय डॉ. एम. एस. स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचा दिमाखदार शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी नगरीत राज्यस्तरीय डॉ. एम. एस. स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचा शानदार शुभारंभ उत्साहात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीच्या पावन निमित्ताने आयोजित या भव्य कृषी सोहळ्याने आधुनिक शेती, तंत्रज्ञान आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या नव्या दिशांचा मार्ग दाखवला. शेतकरी, तरुण, महिला, विद्यार्थी, कृषी तज्ज्ञ, संत-महंत, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या प्रचंड उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाने आष्टीच्या दुष्काळी भूमीत नवचैतन्य निर्माण केले.

तरुणांनी कृषी उद्योजकतेकडे वळावे - भीमराव धोंडे

स्वागताध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दमदार भाषणात तरुणांना थेट आवाहन केले. शेती ही केवळ परंपरा नसून भविष्य आहे. स्टार्टअप इंडिया, कृषी प्रक्रिया उद्योग, अन्नप्रक्रिया, निर्यात आणि मूल्यवर्धन यांमधून तरुणांनी रोजगारनिर्माते बनावे. त्यांनी पुढे सांगितले: कृषी आधारित उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा बनू शकतात आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारल्याशिवाय शेती टिकणार नाही, शेतकरी शिक्षण आणि तंत्रज्ञान यांचा संगम आवश्यक धोंडे यांनी आपल्या संस्थेमार्फत शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेत ग्रामीण भागात परिवर्तन घडवण्याचा संकल्प व्यक्त केला.

**एआय शिवाय शेतीचे भविष्य नाही - बाळासाहेब आजबे**

माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर भर देत सांगितले:

एआय आधारित शेती ही स्वप्न नाही, ती आजची गरज आहे.

त्यांनी पुढील उपयोग स्पष्ट केले: अचूक पाणी व्यवस्थापन, हवामान अंदाजावर आधारित पीक नियोजन, कीड व रोगांचे डिजिटल निरीक्षण, उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढ, त्यांच्या मते, तंत्रज्ञान स्वीकारणारा शेतकरीच उद्याचा यशस्वी शेतकरी ठरेल.

हमीभावाशिवाय शेती टिकणार नाही - आदिनाथ महाराज आंधळे



**भावनिक क्षण: स्व. अजितदादा पवारांना अभिवादन**

कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यांचा संदेश प्रदर्शित करण्यात आला, ज्यामुळे सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले.

धर्माचार्य आदिनाथ महाराज आंधळे यांनी शासनाच्या धोरणांवर परखड भाष्य करताना सांगितले: फुकट योजनांनी समाजाची कार्यक्षमता कमी होते. शेतकऱ्याला दान नव्हे, न्याय हवा - उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव हवा.

त्यांनी उपस्थित केलेले महत्त्वाचे मुद्दे:

रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता घटते, सेंद्रिय शेती ही आरोग्यदायी पर्याय, देशी गाईंचे संगोपन शेतीसाठी उपयुक्त, शेतकरी आत्महत्यांचे मूळ आर्थिक असुरक्षिततेत, त्यांनी शेतकऱ्याला ‘राजा’ म्हणून सन्मान देण्याची वेळ आल्याचे ठामपणे सांगितले.

**दुष्काळी भागासाठी यांत्रिकीकरण आणि सिंचन गरजेचे - सुनीलदादा चव्हाण**

माजी सनदी अधिकारी सुनीलदादा चव्हाण यांनी आष्टीसारख्या दुष्काळग्रस्त भागात शेतीच्या नव्या मॉडेलची गरज अधोरेखित केली.

त्यांच्या मते: शाश्वत सिंचनाशिवाय शेती अस्थिर मजूर टंचाईमुळे यांत्रिकीकरण अपरिहार्य पीक पद्धतीत बदल आवश्यक जलसंधारणावर भर दिला पाहिजे प्रदर्शनाची वैशिष्ट्ये: आधुनिक शेतीचा अनुभव या राज्यस्तरीय प्रदर्शनात शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मार्गदर्शन देण्यात आले.

अत्याधुनिक कृषी अवजारे, ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, सेंद्रिय शेती मॉडेल, एआय आधारित स्मार्ट शेती उपाय, पीक संरक्षण व मृदा व्यवस्थापन, प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवेचा व्यापक संकल्प, भीमराव धोंडे यांनी ग्रामीण भागासाठी पुढील उपक्रम जाहीर केले:

१०० शैक्षणिक संस्था, ४०,००० विद्यार्थ्यांना शिक्षण सुविधा, १०० एकर जमीन दान, २०० कोटींचे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प ग्रामीण विकासासाठी शिक्षण व आरोग्य हे दोन प्रमुख स्तंभ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**लोकसहभागाची विक्रमी उपस्थिती**

या भव्य सोहळ्यास लोकप्रतिनिधी, संत-महंत, कृषी अधिकारी, शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी, महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आष्टी नगरीने राज्यस्तरीय कृषी आंदोलनाचे केंद्र बनत प्रगत शेतीचा संदेश दिला.

**निष्कर्ष: शेतीतून समृद्धीकडे वाटचाल**

आष्टीतील राज्यस्तरीय डॉ. एम. एस. स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाने स्पष्ट संदेश दिला - तंत्रज्ञान, शाश्वतता आणि उद्योजकता यांचा संगमच शेतीचे भविष्य घडवणार आहे. शेतकरी राजा आहे, पण त्या राजाला आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान आणि योग्य धोरणांची साथ मिळाली तरच ग्रामीण भारत खऱ्या अर्थाने समृद्ध होईल.

## अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून आदित्यच्या विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेचे धडे

### आदित्य औषधशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची घाटसावळी येथे शैक्षणिक भेट

बीड । प्रतिनिधी

आदित्य औषधशास्त्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम, घाटसावळी येथे भेट देत सामाजिक संवेदनशीलतेचा जिवंत अनुभव घेतला.५० विद्यार्थ्यांनी अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून सामाजिक जाणीवेचे धडे मिळाले.

अभ्यासक्रमानुसार अनाथ/वृद्धाश्रम भेट देणे अनिवार्य असून,विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सार्वजनिक विकासाची भावना आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११





ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या भेटीत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली. तसेच कडधान्ये व फळांचे वाटप करून सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली. वृद्धाश्रमाचे संचालक व समाजसेवक चंद्रकांत सर यांनी समाजाशी नाळ जोडून काम करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. ‘‘युवा पिढीने सामाजिक बांधिलकी जोपासली तरच समाज सुदृढ बनेल,’’ असे मार्गदर्शन त्यांनी केले. डॉ. कुमार सुरवसे यांनी अनाथ व वृद्धांच्या समस्या, त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि समाजाने त्यांच्याप्रती असलेली जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. सुरवसे यांच्या संकल्पनेतून,प्रा. मोराळे व प्रा. वाघमोडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**समाजाशी नाळ जोडण्याचा संदेश**

अनाथ व वृद्धाश्रम भेट ही केवळ अभ्यासक्रमाची औपचारिकता नसून, विद्यार्थ्यांमध्ये मानवतेचे मूल्य रुजवणारा उपक्रम आहे. युवा पिढीने समाजातील दुर्लक्षित घटकांकडे सहानुभूतीने पाहून त्यांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेतला तरच सामाजिक विकासाला खरी गती मिळेल, असा संदेश या भेटीतून देण्यात आला.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### कुल्र्यामध्ये मंडपात

मृत्युमुखी पडलेल्या ग्रामसेवक अरविंद आगलावे यांचे देखील नाव आल्याने आणि त्यांच्या नावाने ऑर्डर इशू झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एटी आगलावे यांच्यावर बैठे पथकाची जबाबदारी दिली गेली असून जेवढ्या कर्मचाऱ्यांच्या नावाने हे आदेश पारित झाले आहेत त्यात पाच वर्षांपूर्वी निधन झालेल्या ग्रामसेवक आगलावे यांचे नाव आल्याने गटशिक्षणाधिकारी यांनी नशा पाणी करून या ऑर्डर काढल्या की काय अशी चर्चा होऊ लागली आहे.

एखादा शासकीय कर्मचारी मयत झाल्यानंतर त्याच्या नावाने प्रशासकीय कामकाजाची ऑर्डर काढण्याचा हा प्रकार म्हणजे गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचा भोंगळपणा उघड करणारा आहे. या ऑर्डरमुळे आता आगलावे कुटुंबाला जो मनस्ताप झाला आहे त्याची भरपाई कोण करणार अशी चर्चा असून समंदर खान हे स्वतः अरविंद आगलावे यांना स्वर्गात जाऊन ऑर्डर इशू करणार का अशी देखील चर्चा सुरू झाली आहे.

प्रशासकीय कामकाजात ढिसाळपणा करून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी आणि संपूर्ण प्रशासनाची अब्रूवेशीला टांगणाऱ्या गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांच्यावर कार्यालयीन कामकाजात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवून निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे

### होळ उपकेंद्रासाठी १०

या आंदोलनाची दखल घेत बीडचे अधिक्षक अभियंता यांनी ३३/११ केव्ही होळ उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्याबाबतचा प्रस्ताव १९ डिसेंबर २०२५ रोजी महावितरण कंपनीच्या मुंबई येथील मुख्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. महावितरण कंपनीच्यावतीने होळचे कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी लेखी स्वरूपात सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिल्यानंतर जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी सुरू केलेले बेमुदत ठिय्या आंदोलन स्थगित केले. मंजुरीनंतर तातडीने कामास प्रारंभ करून उपकेंद्राची क्षमता वाढविण्यात यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, रोहित्राची क्षमता वाढल्यास होळ परिसरातील शेतीपंप व घरगुती वीजपुरवठा अधिक स्थिर व सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### वाघोरा येथे शिवजन्मोत्सव

गीतावर नृत्य सादर केले, गीत, पोवाडा ,पाळणा गायन केले. शिवराया विषयी विविध पुस्तकांचे वाचन व प्रश्नमंजुषा घेण्यात आली. गड किल्ल्यांचे मातकाम, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. गावकऱ्यांनी रात्री प्रत्येक घरावर दिव्यांच्या प्रकाशाची रोशनाई सह विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय राठोड तर सूत्रसंचालन गणेश झाटे यांनी केले. कार्यक्रमाची वेशभूषा, शृंगार मार्गदर्शन केशव बादाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक बादल डेंगळे,शा.व्य. स.अध्यक्ष अरुण बादाडे, उपाध्यक्ष गणेश बादाडे, माधव गड्डापोड होते. कार्यक्रमास विशेष सहकार्य गावकऱ्यासह वाघेश्वर प्रतिष्ठान यांनी केले. श्रीराम बादाडे, गणेश बादाडे, किशोर बादाडे, लखन बादाडे, सचिन बादाडे यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले. उपस्थित यांचे आभार बबन कपाटे यांनी मानले.कार्यक्रमास विद्यार्थी गावकरी माता पालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सलग दोन दिवस

नगर, बहिरवाडी, बीड) हे आपल्या मुलासोबत सामान्य रुग्णालयाकडे जात असताना दोन महिला आरोपींनी त्यांना अडवून मोटारसायकलची चावी काढून घेतली. पीडित हे वयोवृद्ध असल्यामुळे त्यांना पुढे जाऊ देण्यास प्रतिकार करण्यात आला. त्यानंतर संबंधित महिलांनी प्रमुख आरोपीला घटनास्थळी बोलावून घेतले व इतर महिला आरोपींसह सर्वांनी मिळून भर रस्त्यात पीडितास मारहाण केली.या घटनेचे व्हिडिओ शूटिंग झाल्यामुळे गुन्हा नोंद करण्यास व पुरावे गोळा करण्यास मोठी मदत झाली आहे. फिर्यादीनुसार आरोपींनी डोक्यावर बोथट वस्तूने मारहाण केली आहे.सदर आरोपींनी दोन दिवसांपूर्वी देखील याच पीडित पक्षास गंभीर दुखापत केली होती. त्या प्रकरणी कलम ३२६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद आहे. सलग दोन दिवस सार्वजनिक ठिकाणी हल्ला करून आरोपींनी गंभीर स्वरूपाची मारहाण केल्यामुळे त्यांच्या हिंसक व धोकादायक प्रवृत्तीची नोंद घेण्यात आली.प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून कलम ३०७ भादंवि (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणातील प्रमुख आरोपी विकी उर्फ पवन किशोर वीर (रा. नवनाथ नगर, , बीड) यास ४८ तासांच्या आत अटक करण्यात आली असून न्यायालयाकडून ५ दिवसांची पोलीस कोठडी () मंजूर झाली आहे. प्रत्यक्षदर्शी व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत.रस्त्यावर दहशत निर्माण करणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी आरोपीविरुद्ध पुढील प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस हवालदार गहिनीनाथ बावनकर, तुळजा सपकाळ, शेख इलियास, मंगेश शिंदे व नवले यांनी संयुक्तरीत्या पार पाडली आहे.

## शिवकार्य समजून घेणे म्हणजेच राष्ट्र निर्मितीचे मूळ समजून घेणे-प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे





**गेवराई । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराज यांनी राजमाता जिजाऊ यांनी पाहीलेले स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले. यासाठी त्यांनी उभारलेला लढा समजून घेणे म्हणजेच राष्ट्र निर्मितीचे मूळ समजून घेणे होय. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांनी केले. ते महिला महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी शुन्यातून स्वराज्य निर्माण केले. स्वराज्याची संकल्पना, लोककल्याणकारी प्रशासन, शिस्त, संघटन आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांमधून शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यकारभाराची दिशा दिली. त्यांचे कार्य समजून घेणे म्हणजे भारताच्या राष्ट्र निर्मितीचे मूळ समजून घेणे होय. महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करून जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी केले. आभारप्रदर्शन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कैलास सावंत यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरणविषयक दृष्टी शाश्वत विकास घडविणारी होती -डॉ. दिनेश कचकूरे

किल्ले धारूर - १९ फेब्रुवारी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद



गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक नीती या विशेष व्याख्यानातून डॉ. दिनेश कुचकुरे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या गडकिल्ल्यांमध्ये पुरेशा पाण्याची सुविधा होती. पर्यावरण विषयक छत्रपती शिवाजी महाराजांची दृष्टी व्यापक होती. पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. शेतीसाठी, मानवी वसाहतीसाठी पाणी गरजेचे असते. छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श राजा, उत्तम प्रशासक, अर्थनीतीज्ञ, युद्धनीती, आरमार विषयक दृष्टिकोन असलेले लोककल्याणकारी राजे होते असे मत नमूद केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराची आवश्यकता आजच्या काळात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले गड किल्ले आजच्या काळातील बांधकाम क्षेत्रातील व्यक्तींना आदर्श शिकविणारे आहेत. मानवाच्या विविध क्रियांमुळे होणारे पर्यावरणाचे प्रदूषण टाळण्यासाठी छत्रपतींनी निर्माण केलेल्या सुविधा विशेष मुलगामी ठरणाऱ्या होत्या. स्वच्छता महत्त्वाची असून स्वच्छतेचा अभावामुळे होणारे दुष्परिणामांना सामना करायला लागू नये यासाठी त्यांचे विचार त्या काळातच नाही तर आजच्या काळातसुद्धा उपयुक्त आहेत असे सांगितले. यावेळी वक्त्यांचा परिचय डॉ. राहुल साळवे यांनी केला. कार्यक्रमाकरिता ऑनलाइन झूम ॲपद्वारे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे,उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ, कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, प्रा. विनायक कापावार यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार प्रा. विनायक कापावार यांनी मानले.

## पात्रुडमध्ये रांगोळीच्या माध्यमातून अवतरले शिवराय

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी



आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे.

अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

## श्री सिद्धेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ वी जयंती येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत भानप (माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष), प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार कमलेश जाब्रस, प्रमुख वक्ते श्रीमती आशालता करपुडे, तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख अमोल ठाकुर, सहसंमेलन प्रमुख रामकृष्ण फुलझळके इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शिबिर गीत, छत्रपती शिवाजी महाराज व पंचपरिवर्तन यांचे पूजन करुन झाले. यानंतर कला विभागाच्या वतीने दिला जाणारा स्व. आशा भावसार पुरस्कार चि. सर्वेश संदीप गिल्डा व कु. मधुरा



स्व.आशा भावसार पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभ, संगणकांचे अंतरंग व चित्रमंजिरी अंक प्रकाशन**

संभाजी राऊत या विद्यार्थ्यांना देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच प्रतिवर्षी साकार होणारा संगणकांचे अंतरंग व चित्रमंजिरी अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मातृ मंदिर विश्वस्त संस्था निगडी पुणे आयोजित समुह गीत गायन स्पर्धेत व पोवाडा गायन स्पर्धेत प्राप्त झालेल्या बक्षीसाचे वितरण करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथी कमलेश जाब्रस यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला तसेच विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनानिमीत्त आयोजित स्पर्धेत बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख वक्त्या श्रीमती आशालता करपुडे यांनी हिंदवी स्वराज्याची पार्श्वभूमी, इतिहास तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची नेतृत्व याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रशांत भानप यांनी केले, प्रास्ताविक श्रीमती रोहिणी वाघीले यांनी केले. बक्षीसाचे वाचन रोहित खिंडरे व श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी केले.आभार श्रीमती सारिका मुंडे व सुत्रसंचलन वरिष्ठ लिपिक श्रीकांत भुसारे यांनी केले.या कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली.शांती मंत्र मंगेश मुळी यांनी सांगितला. शिबिर गीत चैतन्य आहेर व संगीत विभागाच्या चमुने सादर केले.यावेळी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर,परमेश्वर आदमाने सर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# थकीत उसाची बिले शेतकऱ्यांना व्याजासह मिळणार

## कारखान्यांकडून आता १० कोटी रुपयांची बँक गॅरंटी



पुणे : सहकारी साखर कारखाने भागीदारी, सहयोगी आणि भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतलेल्या राज्यातील खासगी कारखान्यांमधील शेतकऱ्यांना उसाच्या रास्त व किफायतशीर अर्थात एफआरपी वेळेत मिळावी. यासाठी या कारखान्यांकडून १० कोटी रुपयांची बँक गॅरंटी घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ठराविक मुदतीमध्ये एफआरपीची रक्कम न दिल्यास या बँक गॅरंटीतून शेतकऱ्यांना व्याजासह ती देण्यात येईल.

बँक गॅरंटीतूनही रक्कम न देता आल्यास संबंधितांच्या स्थावर व जंगम मालमत्तेमधून ही रक्कम वसूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. राज्यातील आर्थिकदृष्ट्या आजारी, अवसायनात असलेले सहकारी साखर कारखाने खासगी कंपन्या, संस्थांना भागीदारी, सहयोगी आणि भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्यात आलेले आहेत. मात्र, या साखर कारखान्यांकडून गाळप हंगामाकरिता शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम विशिष्ट मुदतीमध्ये न दिल्यास सहकार विभागाला कारवाईचा अधिकार नव्हता. त्यामुळे अशा कारखान्यांवर अंकुश नव्हता. परिणामी शेतकऱ्यांची पिळवणूक होत होती. अशा अनेक तक्रारी दाखल झाल्यानंतर साखर आयुक्तालयाने अशा कारखान्यांकडून १० कोटी रुपयांची बँक गॅरंटी घेण्यात यावी. यातून शेतकऱ्यांची थकीत एफआरपी देण्यात येईल, असा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. त्याला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यानुसार गाळप हंगामाकरिता गाळप परवाना अर्ज करताना अशा एजन्सी, कंपनीकडून किवा अन्य साखर कारखान्यांकडून किमान रुपये १० कोटी रकमेची बँक गॅरंटी साखर आयुक्तांच्या नावाने घेण्यात येणार आहे. गाळप हंगामामध्ये विशिष्ट मुदतीमध्ये एफआरपीची संपूर्ण रक्कम दिल्याचा निरंक दाखला गाळप हंगामाच्या अखेरीस सादर केल्यानंतर ही बँक गॅरंटी संबंधितांना परत करण्यात येईल. मात्र, या मुदतीमध्ये एफआरपीची रक्कम न दिल्यास बँक गॅरंटीतून देण्यात येईल.

नसता जप्तीची कारवाई

भागीदारी, सहयोगी, भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत जप्तीची कारवाई मूळ सहकारी साखर कारखान्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर करता येणार नाही. त्यामुळे एफआरपी देण्यात विलंब झाल्यास संबंधित एजन्सी, कंपनीच्या किंवा साखर कारखान्याच्या स्थावर, बगॅस आणि इतर उत्पादनांवर जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

## येत्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही



राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी राज्य सरकारने कर्ज निवारण योजना हाती घेतली आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी गाव पातळीवर याद्याही तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी लागणाऱ्या निधीचे आकडेही चर्चेत आले होते. यावरून ही कर्जमाफी येत्या अर्थसंकल्पात दिली जाईल, असे संकेत मिळत असतानाच प्रस्तावित कर्जमाफी येत्या अर्थसंकल्पात दिली जाणार नाही, असे संकेत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.

अशा कर्जमाफीच्या घोषणा करण्यासाठी नियमानुसार अर्थसंकल्पात तांत्रिक मर्यादा येतात, अशी पुस्ती जोडत त्यांनी कर्जमाफीसंदर्भातील नियमांवर बोट ठेवले. यामुळे सरकारकडून कर्जमाफीसाठी चाळण्या लावण्याचा खटाटोप सुरू असल्याच्या टिकेने जोर धरला आहे. तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनाला आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मंत्री पाटील यांना कर्जमाफीबाबतचे वक्तव्य केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपासून कर्जमाफी देण्यासाठी सरकारने हालचाली सुरू केल्या.

यातूनच राज्यातील शेती क्षेत्रात, तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी शासनामार्फत अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेची आखणी सुरू केली. कर्जमाफी योजनेसाठी लागणाऱ्या निधीच्याही चर्चा घडून आल्या. त्यामुळे काही महिन्यांपासून शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेकडे डोळे लावून बसले आहेत. आज ना उद्या कर्जमाफी मिळेल, या आशेने अनेक शेतकऱ्यांनी त्यांचे थकीत कर्जही भरलेले नाही. परंतु, पाटील यांच्या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे दिसत आहे, अशी भावनाही काही शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## मिल्क थिसल या औषधी वनस्पतीच्या लागवडीतून होतो लाखोंचा फायदा



मिल्क थिसल ही एक औषधी वनस्पती आहे, आणि विशेष म्हणजे ह्या वनस्पतीचे उत्पादन हे दुष्काळी भागात देखील घेता येऊ शकते. म्हणुन पाण्याच्या अभाव असलेले शेतकरी देखील कमी पाण्यात ह्या पिकांचे उत्पादन अगदी सहजरीत्या घेऊ शकतात. एवढेच काय आता सरकार देखील ह्या पिकाच्या लागवडीला प्रोत्साहन देत आहे. ही वनस्पती औषधीगुणांनी भरपूर अशी असते. ही वनस्पती सहा महिन्यातच तयार होते म्हणजे कमी कालावधीत येणारे पिक आपण ह्याला मानू शकतो. साधारणतः एप्रिल महिन्यात ह्याच्या बीयांची पेरणी केली जाते. मिल्क थिसल एक काटेरी झाडी वनस्पती आहे. ह्या वनस्पतीची लांबी सुमारे २.५-३ फुटपर्यंत असते. ह्या वनस्पतीच्या बिया ह्या औषधी उपयोगी असतात. ह्या वनस्पतीच्या फुलांमध्ये बिया असतात. एवढेच नव्हे तर ह्या वनस्पतीचे सर्व भाग औषधी आहेत असे सांगितले जाते व पानाचा देखील औषध म्हणून वापर केला जातो.

पेरणी करतानाची काळजी : मिल्क थिसलची लागवड सामान्य शेतकऱ्यांपर्यंत नेण्यासाठी गेल्या दशकापासून प्रयत्न सुरू आहेत. हर्बल गाईड मध्ये ही औषधी वनस्पती वाढवण्याची चाचणी पूर्णपणे यशस्वी झाली आहे. भारतीय शेतकऱ्यांसाठी मिल्क थिसल हे अजूनही एक नवीन पीक आहे. मात्र ही माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मिल्क थिसलच्या फुले आणि बिया यकृत आणि पित्त नलिकांवर उपचार करण्यासाठी वापरल्या जातात. या व्यतिरिक्त, हे अनेक आजारावर फायदेशीर असल्याचे मानले जाते. मिल्क थिसल च्या बियाण्याची पेरणी काळजीपूर्वक करावी.

जमीन : मिल्क थिसल लागवडीसाठी चिकण माती असलेली जमीन सर्वात योग्य मानली जाते. देशाची जवळजवळ निम्मी शेती गाळाच्या जमिनीवर केली जाते. या जमिनीत नायट्रोजन आणि पोटॅशचे प्रमाण कमी असते. पण चांगली गोष्ट अशी आहे की मिल्क थिसल या जमिनीत देखील पिकवता येते व त्याचे उत्पादनावर काही फरक पडत नाही.

काळी माती आणि लाल मातीमध्येही मिल्क थिसलची लागवड करता येते. पण हे लक्षात ठेवावे लागेल की शेतात पुरेशी पाण्याच्या निकासाची सुविधा असावी. पेरणीपूर्वी शेताची दुबार नांगरणी करणे आवश्यक आहे. मग फळी चालवून शेत समतल केले जाते. शेतात तण नसावे.

बियाणे तयार करण्याची पद्धत : मिल्क थिसलचे बियाणे तयार करताना शेतात सुमारे अर्धा इंच खोलीवर पेरली पाहिजेत. पेरणीपूर्वी अंकुरणासाठी मातीमध्ये योग्य खत टाकावे. मिल्क थिसलचे बियाणे तीन ते चार बियांच्या गटात लावावे. पेरणीनंतर तुषार सिंचनाचा वापर योग्य पर्याय ठरू शकतो. मिल्क थिसलचे पिक उगवण्यासाठी १० ते १२ दिवस लागतात. आपण ते घरी भांड्यामध्ये देखील वाढवू शकता. मिल्क थिसल लागवड करणारे शेतकरी म्हणतात की त्याची मागणी आणि लोकप्रियता खूप वाढत आहे आणि भारत त्याची निर्यात करत आहे. जर तुमच्याकडे हलकी माती असलेली जमीन असेल तर ह्या पिकाची लागवड करणे आपल्यासाठी उत्तम परिणाम देणारे ठरू शकते. कमी खर्चात जास्त नफा मिळवून देणारे हे पिक आहे.




### जागतिक दिवस
### सामाजिक न्याय दिवस

### महत्वाच्या घटना

१८४२ : जॉर्ज ग्रीनॉ याला शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८४८ : कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी साम्यवादाचा जाहीरनामा 'द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' प्रकाशित केला.
१८७८ : न्यू हेवन, कनेक्टिकट येथे पहिली टेलिफोन डिरेक्टरी प्रकाशित करण्यात आली.
१९१५ : लाहोर कट लाहोर, बनारस व मीरत या ठिकाणी सशस्त्र क्रांतिकारी उठाव झाला.
१९१६ : आजपासूनच वर्डन च्या युद्धाला सुरुवात झाली.
१९२५ : 'द न्यूयॉर्कर' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५२ : भारताचे पहिले सर्वसाधारण निवडणूक संपतात
१९५३ : तिलैया धारण अणि बोकारो वीज स्टेशन प्रधानमंत्री द्वारे उद्घाटन करण्यात आले होते
१९६७ : जिनिव्हा येथे नि:शस्त्रीकरण शिखर परिषद याच दिवशी पार
१९७२ : सोव्हिएत संघाचे मानवरहित अंतराळयान लुना २० हे चंद्रावर उतरले.
१९७५ : जयश्री गडकर व बाळ धुरी यांचा विवाह झाला!
२००१ : आजच्या दिवशी महाकुंभ मेळ्याचा समारोप झाला.
२००४ : लॉंस टेनिस डब्ल्यू.टी.ए. मध्ये खिताब जिंकणारी सानिया मिर्झा पहिली भारतीय महिला खेळाडू बनली.
२०१३ : हैदराबाद मध्ये अनेक बॉम्बस्फोटांमध्ये किमान १७ जण ठार आणि ११९ जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७५ : जीन काल्मेंट - १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला (मृत्यू: ४ ऑगस्ट १९९७)
१८९४ : डॉ. शांतिस्वरुप भटनागर - वैज्ञानिक (मृत्यू: १ जानेवारी १९५५)
१८९६ : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' हिन्दी साहित्यिक. त्यांनी ४४ ग्रंथ लिहिले. कन्येच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेल्या 'सरोजस्मृती' या शोकगीताची हिन्दीतील सर्वश्रेष्ठ विलापिकांमध्ये गणना होते. (मृत्यू:१५ आक्टोबर १९६१)
१८९९ : प्रसिद्ध भारतीय कवी सुर्यकांत त्रिपाठी यांचा जन्म.
१९११ : भबतोष दत्ता - अर्थतज्ञ (मृत्यू: ११ जानेवारी १९९७)
१९४२ : जयश्री गडकर - अभिनेत्री (मृत्यू: २९ ऑगस्ट २००८)
१९४३ : ड्रीमवर्क्स चे सहसंस्थापक डेव्हिड गेफ्फेन यांचा जन्म.
१९७० : मायकेल स्लॅटर - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६१ : नोबेल पुरस्काराने सन्मानित अभिजित बॅनर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२९ : चन्नम्मा - कित्तूरची राणी (जन्म: २३ आक्टोबर १७७८)
१८२९ : राणी चेन्मम्माचा मृत्यू झाला.
१९१३ : सेनापती व बंगालचे क्रांतिकारक वीरेंद्रनाथ यांना याच दिवशी फ़ाशी
१९६५ : 'माल्कम एक्स' - कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढणारे अमेरिकन नेते (जन्म: १९ मे १९२५)
१९७० : मध्यप्रदेश चे माजी गव्हर्नर हरी विनायक पाटस्कर यांचे निधन.
१९७५ : गजानन हरी तथा राजा नेन- चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक (जन्म: १८ सप्टेंबर१९१२)
१९७७ : रा. श्री. जोग - साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (जन्म: १५ मे १९०३)
१९९१ : नूतन बहल - चित्रपट अभिनेत्री (जन्म: ४ जून १९३६)
१९९८ : ओमप्रकाश बक्षी ऊर्फ 'ओमप्रकाश' - चरित्र अभिनेते (जन्म: १९ डिसेंबर १९१९)
२०११ : अमेरिकन लेखक आणि पटकथालेखक व माईलस्टोन मीडिया चे सहसंस्थापक ड्वोन मॅकडफी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९६२

## हरितगृहामधील जरबेरा लागवडीची माहिती



जरबेरा हे एक फुलझाडे असून त्यांची विविध प्रकारच्या हवामानात लागवड केली जाते. जरबेरा मध्ये सिंगल, डबल असे प्रकार असून, त्या विविध रंगाचे असतात.

जरबेरा साठी आवश्यक जमीन : जरबेराची लागवड कोणत्याही प्रकारच्या जमिनीत करता येते. जमीन तयार करताना ती भुसभुशीत व पाण्याचा निचरा होणारी असावी तसेच पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी शेणखत अथवा पीट जमिनीच्या मगदुराप्रमाणे मिसळावे.

तसेच जमीन मध्यम खोलीची म्हणजेच अशा जमिनीत मुळांची वाढ व्यवस्थित होईल. जमिनीची खोली साधारणतः एक मीटर असावी. चल पाण्याचा योग्य निचरा होत नसेल तर ७० ते १०० सेंटीमीटर खोलीवर ड्रेनेज लाईन टाकावी. ड्रेनेजच्या दोन लाईन मध्ये तीन मीटर अंतर असावे. तसेच जमिनीचा सामू सहा ते सातच्या दरम्यान असावा.

जरबेरासाठी आवश्यक हवामान : जरबेरा साठी दिवसाचे तापमान २७० सेंटीग्रेड पेक्षा जास्त नसावे. रात्रीचे तापमान १८० सेंटिग्रेड पेक्षा कमी असावे. कमीत कमी तापमानात १०० सेंटीग्रेड पेक्षा कमी होऊ नये. स्वच्छ सूर्यप्रकाश या पिकास मानवतो. पण उन्हाळ्याच्या दिवसात पिकास सावली देण्याकरिता ५० टक्के शेडनेटचा वापर करावा. हिवाळ्याच्या दिवसातील कमी सूर्यप्रकाश पिकाच्या वाढीस हानीकारक ठरतो.

पाणी व्यवस्थापन : पाण्याची प्रत चांगली असावी तसेच पिकाला देण्यात येणाऱ्या पाण्यात विरघळलेल्या क्षारांचे प्रमाण सहाशे ते आठशे च्या दरम्यान असावे.

जमिनीचे निर्जंतुकीकरण : जरबेरा हे पीक विविध बुरशीजन्य रोगांना फारच संवेदनक्षम असल्यामुळे जमिनीचे निर्जंतुकीकरण करणे गरजेचे ठरते. निर्जंतुकीकरणासाठी ०.२ फॉर्मल डिहाइड चे द्रावण जमिनीवर शिंपडावे व त्यावर पॉलिथिन पेपर लगोलग अंथरावा ४८ तास तसाच ठेवावा. ४८ तासानंतर पॉलिथिन काढून घ्यावे व एका आठवड्यात जमीन तशीच उघडी ठेवावी म्हणजे विषारी वायू निघून जाईल. जमिनीत उरलेला आयुष्य मग स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावा. त्यासाठी १०० लिटर पाणी/ चौ. मी. वापरावे. वाफेचा हि वापर निर्जंतुकीकरणासाठी केला जातो पण ती फार खर्च पद्धत आहे.

जमिनीची मशागत : जमिनीची नांगरट व कुळवणी करून जमीन भुसभुशीत करावी. त्यानंतर ३० सेंटिमीटर उंचीचे गादी वाफे करावेत. व त्यांची रुंदी ६० ते १०० सेंटीमीटर असावी तर लांबी ३० मीटरपर्यंत असावी. दोन वाफ्यामध्ये ३० ते ४० सेंटिमीटर अंतर असावे.

लागवड : गादी वाक्यावर तीन ते चार ओळीत रोपे लावावीत. दोन रूपात ३० बाय ३० सेंटिमीटर अंतर ठेवावे. सात ते नऊ झाडे प्रति चौ मी बसतील अशा प्रकारे लावावे. २८ ते ३० हजार झाडे प्रतिएकरी लावावीत.

उती संवर्धन पद्धतीने तयार केलेली रोपे लावावीत. तसेच उत्पन्न अधिक देतात आणि गुणवत्तेने सारखे वाढतात झाडे जास्त खोलवर लावू नयेत तसेच जूनमध्ये लागवड केल्यास झाडांची चांगली वाढ होते. तर ऑगस्टमध्ये लागवड केल्यास हिवाळ्यात व वसंत ऋतूत भरपूर फुले मिळतात. वाळलेली पाने व जुनाट पाने वेळच्यावेळी काढून टाकावीत.

पाणी व्यवस्थापन : सकाळच्या वेळेस पिकास पाणी द्यावे. जेणेकरून बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव कमी होईल व पाण्याची प्रत चांगली असावी. जमीन दहा सेंटिमीटर खोलीपर्यंत ओल राहील अशा तऱ्हेने पाणी द्यावे. जेणेकरून आवश्यक तेवढेच पाणी देता येईल.

लागवड झाल्यास हरितगृहात जर २२ ते २५० तापमान राहिले तर मुलांच्या झाडांची चांगली वाढ होते. रात्रीचे तापमान १२ ते दीडशे सेंटिमीटर असावे. वरील प्रमाणे तापमान तीन ते चार आठवडे ठेवावे. सुरुवातीच्या काळात झाडांना भरपूर पाणी देऊ नये अन्यथा झाडांच्या मध्यभागी पाणी जाऊन खोडकुज हा रोग होतो. चांगली उत्पादन क्षमता असलेल्या झाडात पाणी व फुलांचे गुणोत्तर २:४ असते.

## राज्यातील ७० टक्के कारखान्यांचे ऊस गाळप पूर्ण



पुणे /प्रतिनिधी

काही वर्षापूर्वी राज्याची दररोज ऊस गाळप क्षमता सुमारे साडेपाच लाख मेट्रिक टन होती. आता ती जवळपास दुप्पट झाली आहे. मात्र, क्षमतेत वाढ असूनही हंगाम लवकर संपत असल्याने साखर उद्योगासमोर आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे साखर हंगाम दोनशे ते अडीचशे दिवस सुरू राहण्यासाठी राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

पाटील म्हणाले, पूर्वी साखर कारखाने जूनपर्यंत कार्यरत राहत; मात्र सध्या ऊस तुटवड्यामुळे केवळ ९० ते १०० दिवसांतच अनेक कारखान्यांना गाळप थांबवावे लागत आहे. वाढलेली गाळप क्षमता आणि घटलेली ऊस उपलब्धता यामधील तफावत दूर करण्यासाठी उत्पादनक्षमता वाढवणे हाच पर्याय उरला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने उसाचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. सध्या राज्यातील सुमारे ७० टक्के कारखान्यांचे गाळप पूर्ण झाले असून, बहुतांश कारखाने १५ मार्चपर्यंत बंद होण्याची शक्यता आहे. पुढील काही वर्षांत कारखान्यांचा कार्यकाळ २०० ते २५० दिवसांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेच्या किमतींमध्ये मंदीचे वातावरण असून, देशांतर्गत वापर सुमारे २७५ लाख मेट्रिक टनांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे उद्योगाला इथेनॉल उत्पादनाकडे अधिक वळावे लागणार आहे. इथेनॉलचा कोटा किमान ६० कोटी लिटरने वाढवावा, अशी मागणी केंद्राकडे करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) वेळेत मिळावा, यासाठी साखरेची किमान विक्री किंमत ४ हजार १०० रुपये करण्याची गरजही पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर आणि महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक नाईकनवरे उपस्थित होते.

# वाळू माफियांना आता हर्सूलचा रस्ता दाखविणार: विजय चव्हाण

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि गौण खनिज चोरी करणाऱ्यांविरुद्ध वाळू माफियांना आता हर्सूल चा रस्ता दाखवणार असा रोखठोक इसारा दंड अधिकारी विजय चव्हाण यांनी केला आहे. महसूल विभागाने अत्यंत कठोर आणि निर्णायक पाऊल उचलले आहे. तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील अवैध धंद्यांचे कंबरडे मोडण्यासाठी व्यापक कायदेशीर मोहीम राबवली जात असून, सराईत गुन्हेगारांना आता थेट कारागृहाची हवा खावी लागणार आहे.. आपेगाव-साष्टपिंपळगाव शिवारातील मोठी कारवाई गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, १६ फेब्रुवारी २०२६ च्या मध्यरात्रीपासून १७ फेब्रुवारी २०२६ च्या पहाटेपर्यंत आपेगाव व साष्टपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक केल्याचे उघड झाले आहे.

नोंदवलेला गुन्हा: याप्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात प्रथम खबर अहवाल क्र. ००४२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईतील आरोपी: हायवा (क्र. -२१--५९३९) चा मालक सचिन अशोकराव देशमुख (रा. रखना) आणि लोडर धारक मंगेश माऊली चौधरी (रा. आपेगाव) यांच्यासह इतर १० ते १२ अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत. मंगेश चौधरी यांनी डोमलगाव , गोंदी ईतर गावातील लोडर धारक यांना बोलावून रेती अवैध उत्खनन करून भरून दिल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच गोंदी येथील व मिनी हायवा तसेच गावातील व परिसरातील ट्रॅक्टर बोलावून भरून देण्याचे काम केल्याची. खात्रीशीर माहिती मिळाली आहे. गावातील व परिसरातील व्यक्तीकडून मंगेश चौधरी यांच्या साथीदारांची गोपनीय माहिती मिळाली असून खात्री करून त्यांच्या विरोधात सुद्धा सक्त कारवाई करण्यात येणार आहे. जप्त माल: अंदाजे ३० ते ४० ब्रास वाळूची विनापरवाना बेकायदेशीर रित्या चोरटी विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. सराईत गुन्हेगारांवर 'दिवाळखोरी' व 'जप्तीची' टांगती

## ४० ब्रास वाळू उपसा करून चोरी



तलवार या प्रकरणातील मुख्य आरोपी मंगेश चौधरी हा सराईत गुन्हेगार असून त्याने यापूर्वी मालमत्तेवर बोजा असतानाही पुन्हा गुन्हा केला आहे. त्यामुळे प्रशासनाने आता खालील कठोर पावले उचलली आहेत. सातबारावर 'महाराष्ट्र शासन' नाव: ज्या आरोपींच्या मालमत्तेवर दंडापोटी बोजा आहे, त्यांनी तात्काळ पैसे न भरल्यास त्यांच्या जमिनीवर महाराष्ट्र शासनाचे नाव लावून त्या जमिनींचा जाहीर लिलाव केला जाईल. दिवाळखोर घोषित करणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार, थकबाकी न भरणाऱ्यांना 'दिवाळखोर' घोषित करून त्यांना अटक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वाहनांची कायमस्वरूपी जप्ती: गुन्ह्यात वापरलेली वाहने आणि यंत्रसामुग्री जप्त करून ती शासनाधीन केली जाणार आहेत. व्यापक मोहीम: २५ गावांतील अवैध केंद्रांचे रडार केवळ आपेगावच नव्हे, तर तालुक्यातील इतर २५ पेक्षा जास्त गावांमध्ये जिथे अवैध उत्खनन सुरू आहे, त्यांचे सर्वेक्षण महसूल पथकांकडून सुरू आहे. शहागड आणि विवा मंडळ मार्गे होणाऱ्या चोरट्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष गोपनीय पथके तैनात करण्यात आली आहेत. . जनतेला आवाहन आणि गोपनीयता तहसीलदार विजय चव्हाण यांनी आवाहन केले आहे की, वाळू माफियांविरोधात जनतेने पुढे येऊन माहिती द्यावी. ओळख गोपनीय: माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव पूर्णपणे गोपनीय राहील. पुरावे सादर करा: नागरिकांकडे असलेले फोटो, व्हिडिओ किंवा इतर पुरावे थेट तहसीलदार कार्यालयाला सादर करावेत, जेणेकरून सराईत गुन्हेगारांवर सक्त कारवाई करता येईल. कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी सदर व्यापक कारवाई जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल व उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष मोहिमेत सहभागी पथक विजय चव्हाण (तहसीलदार, अंबड) श्री. बामणावत मंडळ अधिकारी, दीपक संजय गवारे तलाठी आपेगाव, सुनील तेजराव उबरहंडे तलाठी साष्टपिंपळगाव, यासोबतच इतर महसूल पथक व पोलीस कर्मचारी या मोहिमेत सक्रिय होते.तहसीलदार विजय चव्हाण यांचा इशारा 'तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट करणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही. ज्यांच्या मालमत्तेवर बोजा आहे त्यांनी तात्काळ दंड भरावा, अन्यथा अटकेची कारवाई आणि मालमत्तेचा लिलाव अटळ आहे. आणि वाळू माफियाला हर्षलचा रस्ता दाखविणार असा इशारा दंड अधिकारी विजय चव्हाण यांनी दिला आहे.

## रातोरात संभाजी महाराजांचा पुतळा बसवल्याने तणाव

### ग्रामस्थांची मोठी गर्दी, पोलिसांचे शांततेचे आवाहन



परभणी। प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील बोरी येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा गुरुवारी (दि.१९) रात्रीच्या वेळी विराजमान करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा पुतळा बसविण्यात आल्याचे संबंधित युवकांचे म्हणणे आहे. मात्र, सदर पुतळा अधिकृत की अनधिकृत, याबाबत प्रशासनाने अद्याप स्पष्ट भूमिका घेतली नसल्याचे समजते पण युवकांनी याबाबतचा ग्रामसभेचा ठराव असल्याचे सांगितले आहे.

गावातील काही युवकांनी सांगितले की, या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारण्यासाठी पूर्वनियोजित जागा निश्चित करण्यात आली असून ग्रामपंचायतीची 'ना हरकत प्रमाणपत्र' देखील उपलब्ध आहे. त्यामुळेच पुतळा बसविण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. मात्र, प्रशासनाकडून कागदपत्रांची पडताळणी सुरू करण्यात आली असून, सर्व बाबींची खातरजमा केल्यानंतरच पुतळ्याच्या अधिकृततेबाबत निर्णय जाहीर केला जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. पुतळा उभारला जात असल्याची माहिती मिळताच बोरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

बेकायदेशीर पुतळा बसविण्यात येत असल्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी जमावास समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणा बाहेर जात असल्याचे लक्षात आल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी बेनिवाल व नंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक गुंजाळ, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी,बोरी ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंगडे यांच्यासह राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या व अतिरिक्त पुढील बंदोबस्त घटनास्थळावर मध्यरात्रीच दाखल झाला होता. दरम्यान झालेल्या गोंधळात पोलीस जमादार दिलावर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर प्रथम बोरी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी गोविंद कोंडीबा कदम (वय ३३, रा. मुडा), आर्यन उमेशराव वाघमारे (वय २३, रा.बोरी), स्वप्नील संजय शिंपले (वय २३, रा.बोरी) यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

संबंधितांना पुढील चौकशीसाठी न्यायालयात हजर करण्यात आल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे. तसेच, घटनास्थळी झालेल्या व्हिडिओ चित्रीकरण व छायाचित्रांच्या आधारे इतर संशयितांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. तपासा दरम्यान आरोपींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, गावात या घटनेबाबत विविध प्रतिक्रिया उमटत असून, पुतळा अधिकृत की अनधिकृत याबाबत प्रशासनाचा अंतिम निर्णय काय येतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. घटनेमुळे बोरी परिसरात सध्या पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## अल्पवयीन मुलीचं अपहरण करुन अत्याचार ;तीन आरोपींना अटक

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्हा प्रतिनिधी- अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. ही घटना अहिल्यानगरच्या राहुरी तालुक्यात घडली. १५ वर्षीय मुलीचं अपहरण करून तिला ५ दिवस जंगलात ठेवले आणि आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळत पीडित मुलीची सुटका केली. या घटनेमुळे अहिल्यानगर हादरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १३ फेब्रुवारी रोजी राहुरी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी तपासाची चक्रे फिरवत आरोपींना अटक केली. ५ दिवसांनंतर नाशिकसुरत रोडजवळ रामशेज किल्ला परिसरातील जंगलातून मुलीची सुटका करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांकडून मुख्य आरोपीसह तिघांना अटक करण्यात आली आहे.

१३ फेब्रुवारी रोजी कॉलेजला जाते असं सांगून घराबाहेर पडलेली १५ वर्षीय मुलगी घरी परत आलीच नाही. पालकांनी तात्काळ राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचा गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरू केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची सूत्रं वेगाने हलवली. नाशिक जिल्ह्यातील जंगल परिसरातून मुलीची सुटका करण्यात पोलिसांना यश मिळालं. या प्रकरणात मुख्य आरोपीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली. पीडितेच्या जबाबानुसार पॉक्सो आणि लैंगिक अत्याचाराचे गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास राहुरी पोलिस करत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ संबंधित मुलीच्या गावात बंद ठेवण्यात आला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत

## राज्य उत्पादन विभागाने पकडली अवैध दारू

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील राणी उंचेगाव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाकडून १ लाख ८४ हजार २५० रुपयांची अवैध दारू जप्त करण्यात आली.



जालना येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी तालुक्यातील राणीउंचेगाव येथे परराज्यातील अवैधरीत्या मद्याची विक्री करणाऱ्या विरोधात कोरड्या दिवसाच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली. राणी उंचेगाव येथे पत्र्याच्या शेडमधे एक इसम गोवा राज्यातील निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत असलेला मद्यसाठा महसूल बुडून अवैधरीत्या बाळगून अवैधरीत्या विक्री करणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर भरारी पथकाने छापा टाकून पत्र्याच्या शेडमध्ये गोवा राज्यात निर्मिती व विक्रीकरिता असलेल्या १६ हजार २०० रुपयांची डॉ.डि.ए.एन चॉईस माल्ट विस्कीच्या १०८ सीलबंद बाटल्या, ३६ हजार २५० रुपयांच्या रॉयल स्टॅग व्हीस्की च्या १४५ सीलबंद दारू बाटल्या, २१ हजार २०० रुपयांच्या ईम्पीरील ब्लू व्हिस्कीच्या ९६ सीलबंद दारू बाटल्या, १० हजार ५६० रुपयांच्या मॅकडॉल नं १ व्हिस्कीच्या ४८ सीलबंद दारू बाटल्या, ६९ हजार १२० रुपयांच्या देशी दारू सखु संत्राच्या ८६४ बाटल्या, ६ हजार रुपयांच्या ईम्पीरील ब्लू व्हिस्की व रॉयल स्टेंट विस्कीच्या रिकाम्या बाटल्या, २५ हजारांचा मोटोरोला कंपनीचा एक मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने शहरालगतच्या ढाब्यासह ग्रामीण भागातील ढावेही तपासणी करणे गरजेचे आहे. अनेक ढाब्यांवर अवैध दारू विक्री होत असल्याची चर्चा आहे.

## एमआयटी लातूर येथे गणेश, महालक्ष्मी, हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना

लातूर। प्रतिनिधी

येथील एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वमैदान परिसरात नव्याने साकारण्यात आलेल्या श्री गणेश, श्री महालक्ष्मी आणि श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना आणि कलशारोहण सोहळा २२ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय, एक लाख स्क्वेअर फूटातील विश्वमैदान क्रीडा संकुलाचा लोकार्पण सोहळा होईल.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, माईर एमआयटीचे विश्वस्त तुळशीराम कराड, प्रगतशील शेतकरी काशिराम कराड यांच्या प्रेरणा आणि आशीर्वादाने होत असलेल्या या सोहळ्यासाठी ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. विद्यानंद महाराज गातेगाव, ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्री, ह.भ.प. विठ्ठल महाराज फड, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. मधुकर कुलकर्णी, डॉ. माया कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी विणा-पूजन, मिरवणूक, श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापना आणि अन्य धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. २१ फेब्रुवारी रोजी प्रासाद वास्तु, कुटीर होम, मुख्य देवता हवन, स्नपनविधी आदी धार्मिक विधी होणार आहेत. सायंकाळी ४.३० ते ६ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यानंतर ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. वामन महाराज जाधव यांचे किर्तन होईल. २२ फेब्रुवारी रोजी प्रातः पूजन, मूर्ती स्थापना, कळसारोहण, उत्तरांग हवन व बलिदान विधी संपन्न होतील. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नारायण महाराज उत्-रेश्वर पिंप्री यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत महापूर्णाहुती, महानैवेद्य दुपारी १२ वाजता, महाआरती १२.३० ते १ आणि महाप्रसाद १ ते ३ या वेळेत होणार आहे. यज्ञप्रमुख आचार्य म्हणून वे. शा. संपन्न श्री रामकृष्ण कुलकर्णी गुरुजी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या सोहळ्यासाठी अनेक कीर्तनकार, भजनकार, टाळकरी व कलाकार यांची उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याला सर्व भाविक भक्तांना उपस्थित राहण्याचे आवाहन माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड आणि आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

## अखेर हट्टा येथे शिवस्मारकाची स्थापना

हिंगोली। प्रतिनिधी

हट्टा येथे शिवस्मारकाची स्थापना करण्याकरीता मागील काही दिवसापासून हालचाली जोमाने सुरू होत्या. गुरूवारी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीचे औचित्य साधून शिवस्मारकाची स्थापना करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. पोलिसांनी शिवभक्तांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा विरोध झुगारून शिवस्मारकाची स्थापना करण्यात आली.

वसमत तालुक्यातील हट्टा येथे मोठी बाजारपेठ आहे. या ठिकाणी पोलिस शिवस्मारकाची ठाण्यासमोर स्थापना करण्याकरीता मागील काही दिवसापासून हालचाली गतिमान झाल्या होत्या. त्या संदर्भात शिवस्मारका करीता ग्रामसभेचा ठरावही घेण्यात आला होता. शिवस्मारका करीता पुष्पक देशमुख यांनी १८ फेब्रुवारीला बी एस नल टॉवर जाऊन आंदोलन सुद्धा करावे लागले होते. त्यामुळे शिवस्मारक उभारणी करत असताना शिवप्रेमींच्या भावना तीव्र होत्या. गेल्या १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीचे औचित्य साधून रात्री ७ ते



आठच्या च्या सुमारास अचानक मोठ्या संख्येने शिवभक्त शिवस्मारकाच्या नियोजित स्थळी जमा झाले. त्यानंतर छत्रपती शिवरायांच्या जायघोशांत घोषणा देत शिवस्मारकाची स्थापना करण्यात आली. व सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद भरून आला यावेळी ग्रामीण भागातून शेकडो शिवभक्त आले होते. या प्रसंगी पुष्पक देशमुख यांनी शिवाजी महाराज पुतळ्याचे पुजन केले. यावेळी हट्टा ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संग्राम जाधव यांनी शिवप्रेमींची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु शिवप्रेमी आपल्या मागणीवर ठाम होते. यावेळी पोउपनि गवळी, ताम्रध्वज कासले, शेख हकीम, इंगोले यांच्यासह इतर पोलिस कर्मचारी बंदोबस्ताला तैनात होते.

# पारंपारिक शेतीला बगल देत शेतकऱ्याचा चिया पिकातून प्रगतीचा नवा मार्ग!

## केज तालुक्यातील बनकरंजा येथील महादेव शंकर नागरगोजे यांचा प्रयोग

केज। प्रतिनिधी

परळी मध्ये झालेल्या महाएक्सपो दरम्यान चिया पीक लागवड अत्यंत शेतकऱ्यांच्या फायद्याचे पीक ठरले आहे. बदलत्या काळात शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करणे काळाची गरज बनल्याचे . ओळखून केज तालुक्यातील बनकरंजा येथील प्रगतशील शेतकरी महादेव शंकर नागरगोजे यांनी पारंपारिक पिकांना फाटा देत 'चिया'या परदेशी पिकाची यशस्वी लागवड केली आहे. विशेष म्हणजे हे पीक पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने व कमी खर्चात तीन ते साडेतीन महिने कालावधी असलेल्या या पिकाने शेतकऱ्यांना सहा ते सात लाखाचे उत्पादन मिळवून दिले आहे. अत्यंत कमी पाणी लागत असलेल्या या ठिकाणी या पिकाने संपूर्ण चिंचाशेत वस्ती शिवारात निळसर-जांभळ्या फुलांची उधळण केली असून, परिसरात हे पीक आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या प्रयोगाची पार्श्वभूमी म्हणजे कमी पाऊस आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे अनेक



शेतकरी अडचणीत असताना, या शेतकऱ्याने आधुनिक बाजारपेठेचा अभ्यास करून 'सुपरफूड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिया



सीड्सला सध्या मोठी मागणी आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या शेतात चिया या पिकाची लागवड केली.

### चिया स्टॉलला पंकजाताईंची भेट

महापशुधन एक्स्पो दिनांक दरम्यान मा.ना. पंकजा गोपीनाथ मुंडे (मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल ,महाराष्ट्र राज्य ) व डॉ. अर्चना नागरगोजे तालुका कृषी अधिकारी परळी यांनी सेंद्रिय उत्पादित चिया सीड्स श्री. महेश नागरगोजे रा. बनकारंजा ता. केज जि. बीड यांच्या स्टॉलला भेट देऊन चिया पिकाची लागवड, उत्पादन व बाजार यावर सविस्तर चर्चा करून अधिक भाव कसा मिळेल याबाबत मार्गदर्शन केले.

चिया पिकाच्या संदर्भात केज तालुका कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक गोरे मॅडम यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभल्याने आम्ही चिया पिकातुन अत्यंत कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये चांगल्या प्रकारे उत्पन्न घेत आहोत तरी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त चिया पिकाची लागवड करून कमी खर्चात उत्पन्न वाढवावे..

-महादेव नागरगोजे ,शेतकरी बनकरंजा

चिया या पिकाचे पिकाची वैशिष्ट्ये आणि फायदा म्हणजेच या पिकाला कमी खर्च , कमी पाणी: कोरडवाहू किंवा कमी पाण्याच्या क्षेत्रासाठी हे पीक अत्यंत फायदेशीर आहे. कोणत्याही प्रकारच्या वन्य प्राण्यांचा त्रास नाही: चियाच्या पानांना विशिष्ट वास असल्यामुळे प्राणी या पिकाचे नुकसान करत नाहीत. आरोग्यदायी महत्त्व: ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबरचा उत्तम स्त्रोत असल्याने बाजारात याला मोठी मागणी आहे. चिया हे लागवडीपासून अवघ्या ३ ते ४ महिन्यांत हे पीक काढणीला येते. ''आजवर आम्ही गहू, हरभरा अशी पिके घेत होतो, पण चिया पिकातून कमी मेहनतीत चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा आहे. चिया या पिकातून एक्करी ६ ते ७ कुंटल इतके उत्त्पन्न मिळते इतर पिकांच्या तुलनेत कमी खर्चामध्ये हे उत्पन्न मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनीही अशा नगदी पिकांकडे वळायला हवे,'' शेतात डोलणारे हे जांभळ्या फुलांचे पीक पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. या यशस्वी प्रयोगामुळे परिसरात 'चिया' लागवडीचा नवा पॅटर्न रुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे मत बनकरंजा येथील प्रगतशील शेतकरी महादेव शंकर नागरगोजे यांनी व्यक्त केले आहे.

दैनिक **राज्य लोकतंत्र**



# श्री खंडोबा मंदिर परिसरातील वनाला पुन्हा आग; प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

श्री खंडोबा मंदिराच्या पवित्र व ऐतिहासिक वनपरिसरात पुन्हा एकदा अज्ञात समाजकंटक व दारू पिणाऱ्या व्यक्तींनी जाणीवपूर्वक आग लावल्याची घटना घडली आहे. या आगीत मोठ्या प्रमाणावर गवत, झुडपे व झाडे जळून खाक झाली असून पर्यावरणासह मंदिर परिसराच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

सदर परिसरात यापूर्वीही अनेकदा अशा घटना घडल्या असून स्थानिक नागरिक, भक्त व सामाजिक कार्यकर्त्यांकडून कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याची मागणी वारंवार करण्यात आली आहे. मात्र, आजतागायत जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणेकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप होत आहे. दररोज या परिसरात दर्शनासाठी येणारे भाविक, फिरायला येणारे पर्यटक तसेच योगा व मॉर्निंग वॉकसाठी येणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अशा ठिकाणी वारंवार लागणाऱ्या आगीमुळे जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते पर्यावरण प्रेमी अणि इतिहास प्रेमी यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत

ते म्हणाले,श्री खंडोबा मंदिर परिसरात आग लागणे ही अपघाती घटना नसून ती जाणीवपूर्वक घडवली जात आहे. आम्ही अनेक वेळा पोलीस चौकी व नियमित गस्त सुरू करण्याची मागणी केली, पण प्रशासन डोळेझाक करत आहे. उद्या जर एखाद्या भक्ताचा किंवा नागरिकाचा जीव गेला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनावर राहील.दरम्यान, नागरिकांकडून प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलीस चौकी स्थापन करणे, रात्रीची गस्त वाढवणे, दारू पिणाऱ्यांवर कारवाई करणे व मंदिर परिसरातील वनपरिसराचे संरक्षण करण्याची जोरदार मागणी करण्यात येत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.






आम्ही श्री खंडोबा मंदिर परिसराच्या सुरक्षिततेबाबत वारंवार जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाकडे लेखी निवेदने दिलेली आहेत. मंदिर परिसरात दारुड्यांच्या पार्ट्या होत असून दारूच्या बाटल्यांचा खच साचल्याचे फोटो पुराव्यासह सादर करून निवेदने दिलेली आहेत. तरीही आजतागायत ना जिल्हा प्रशासनाने ना पोलीस प्रशासनाने आमच्या निवेदनाची दखल घेतलेली नाही. याबाबत संबंधितांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता संबंधित व्यक्ती आमच्याशी हुलजत घालतात, अरेरावी करतात व थेट भांडणाला उठतात. अशा प्रकारच्या घटनांना दररोज सामोरे जाणे शक्य नसून त्यामुळे मंदिर परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. मंदिर परिसराच्या संरक्षणासाठी उभारण्यात येणाऱ्या संरक्षण भिंतीच्या (कंपाउंड वॉल) कामाचा मोठा भाग अद्याप अर्धवट अवस्थेत आहे. आम्ही आमच्या पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत, मात्र प्रशासनाकडून तातडीचे संरक्षण, पोलीस चौकी व नियमित गस्त मिळाल्याशिवाय हा पवित्र परिसर सुरक्षित राहू शकत नाही. भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील.
– रामनाथ खोड, कोषाध्यक्ष, श्री खंडोबा दिपमाळ मंदिर

# कुल्यामध्ये मंडपात दहावीची परीक्षा

## बीडच्या बीईओचा प्रताप मयत कर्मचाऱ्याला दिली परीक्षेची ड्युटी

बीड । प्रतिनिधी

दहावीच्या परीक्षेला आजपासून प्रारंभ झाला बीड जिल्ह्यातील कुरला येथे परीक्षा केंद्र मंजूर असताना इमारती ऐवजी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी चक्क मंडप टाकल्याचा प्रकार समोर आला याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश शिक्षण अधिकाऱ्यांनी दिले मात्र दुसऱ्या एका घटनेत बीड तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी समंदर खान यांनी मात्र बैठे पथकामध्ये एका मयत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून ऑर्डर काढल्याचे प्रकरण समोर आल्याने शिक्षण विभागाचा आंधळेपणा पुन्हा एकदा समोर आला आहे



बीडचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान हे या नात्याकारणामुळे नेहमीच चर्चेत असतात या महाशयांनी दहावीच्या भरारी पथक आणि बैठे पथक नियुक्त करताना चक्क चार-पाच वर्षांपूर्वी मयत झालेल्या ग्रामसेवकाच्या नावाने ऑर्डर काढून आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत.

गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांनी बीड पंचायत समिती अंतर्गत असलेल्या ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांच्या नावाने बैठे पथक आणि भरारी पथक नियुक्त केले आहे. यामध्ये २०२१ साली आजारपणामुळे ◀◀ पान ३ वर

# राक्षसभुवनच्या विश्रामगृहाची दुरावस्था

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शनी महाराजांच्या अधिष्ठान असलेले राक्षसभुवन या ठिकाणी पुरातन काळापासून विश्राम ग्रह आहे. मात्र गेल्या काही वर्षापासून या विश्रामगृहाची दुरावस्था झाली असून याचे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आले आहेत. याबरोबरच विजेची सोयही व्यवस्थित नाही. परिसराची स्वच्छता नाही. या विश्रामगृहाची दुरुस्ती करावी अशी मागणी भाविकातून होत आहे.

महाराष्ट्रातील महत्त्वाचे ठिकाण म्हणून राक्षसभुवन शनीचे या गावाला ओळखले जाते.अगदी गोदावरी नदी पात्रातच शनी महाराजांचे मंदिर आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातील भाविक येतात. आतापर्यंत या ठिकाणी जायला रस्ता ही धड नव्हता मात्र आ. लक्ष्मण पवार यांनी याकडे विशेष लक्ष देऊन हा रस्ता पूर्ण केला. या ठिकाणी पुरातन काळापासून विश्रामग्रह आहे. बाहेरून येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी यासाठी हे विश्रामगृह बांधण्यात आले होते. मात्र आज या विश्रामगृहाची दुरावस्था झाली आहे. परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य आहे. शौचालयाचे दरवाजेही नीट नाहीत. या ठिकाणी असलेल्या सुट ला दरवाजे नाहीत. या ठिकाणी कर्मचारीही नाहीत. विजेची सोय नाही. त्यामुळे गावातील टगे लोक या ठिकाणी आपले बस्तान बांधत आहेत. भाविकांना राहण्यासाठी योग्य असे सुसज्ज विश्रामगृह याठिकाणी आवश्यक आहे. त्यासाठी या ठिकाणच्या विश्रामगृह इमारतीची दुरुस्ती व्हावी अशी मागणी भाविकातून केली जात आहे.



# पिंपळनेर पोलिसांचे सात ठिकाणी छापे; २९ हजाराची दारू पकडली



**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त अनुज्ञप्त्या बंद असतानांही काही ठिकाणी चोरून दारू विक्री होत असल्याची माहिती पिंपळनेर पोलिसांना मिळाल्यावरुन त्यांनी नाथापूर, पिंपळनेर, इट, सांडरवन, म्हाळसापूर जवळा, पिंपळादेवी, गंगनाथवाडी या सात ठिकाणी छापे मारून सात जनावर गुन्हे दाखल करून २९ हजार १५० रुपयाची दारू जप्त केली.**

शिवाजी महाराजांची जयंती असल्याने जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील अनुज्ञप्त्या बंद करण्याचे आदेश निर्गमित केले होते. पिंपळनेर पोलिसांनी दंडात्मक कारवाई करण्यासाठी पेट्रोलियम सुरू केली. पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सपोनि. घुगे, पोउपनि गोलवाल, पो उपनि.शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेऊन नाथापूर, पिंपळनेर,सांडरवन, म्हाळसापूर जवळा, पिंपळादेवी, गंगनाथवाडी या सात ठिकाणी छापे मारून देशी व विदेशी अशी २९ हजार १५० रुपयांची दारू जप्त केली. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी. मधुसूदन घुगे पोउपनि. ए.सी. गोलवाल,पो. उपनिरीक्षक. पंकज शिंदे पोलीस शिपाई सादिक पठाण, शशिकांत ढाकणे, अनिल विघ्ने, पिंपळे, होमगार्ड जंवजाळ ,शेलार ,थापडे आदींनी केली.

# संत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आज सुनीताताई आंधळे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाचे करण्यात आले आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी दुपारी २.०० वाजता मिरवणुकीनंतर कळसपूजन आणि विनापूजन होणार आहे. दुपारी ४.०० वाजत ह.भ.प. अंगद महाराज मोरे, नगरबाई गदळे यांचे प्रवचन तर रात्री सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात हिंदूभूषण ह.भ प. सुनीताताई आंधळे, आळंदी यांचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसाद होणार आहे. श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर आयोजित सर्व कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




# होळ उपकेंद्रासाठी १० एमव्हीए रोहित्र मंजुरी प्रक्रियेला गती; ‘महावितरण’ने प्रस्ताव पाठविला

### ‘महावितरण’च्या आश्वासनानंतर कुलदीप करपेंचे आंदोलन स्थगित

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसविण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांचे बेमुदत ठिय्या आंदोलन महावितरण कंपनीकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर शुक्रवारी (दि.२०) स्थगित करण्यात आले आहे.

होळ उपकेंद्राच्या क्षमतेअभावी परिसरातील शेतकरी व वीज ग्राहकांना कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा आणि शेतीपंपांच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने ११ डिसेंबर २०२५ रोजी निवेदन देऊन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. ◀◀ पान ३ वर



# गंगाबाई शिंदे यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



गंगाबाई नानाभाऊ शिंदे (वय १०४) रा. होळ यांचे दि.२० फेब्रुवारी दुपारी एक वा. वृद्धापकाळाने निधन झाले.गंगाबाई शिंदे या गेल्या दोन महिन्यांपासून आजारी होत्या.दि. २० फेब्रुवारी दुपारी एक वाजता त्यांची अखेर प्राण ज्योत मालवली.

स्व.गंगाबाई यांच्या पार्थिवावर मौजे होळ येथील स्वतःच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी होळ येथील ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

गंगाबाई यांच्या पश्चात तीन मुले संदिपान, वसुदेव,श्रीकिशन व गवळण,उषा या दोन मुली,सुना,नातवंडे, पतवंडे,असा मोठा परिवार आहे.

# मुकाअच्या आदेशाला गटशिक्षणाधिकाऱ्याकडून केराची टोपली

## प्रति नियुक्ती बंद असताना एका दिवसात केली प्रतिनियुक्ती

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांनी जिल्हा परिषदेच्या कुठल्याही कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती देऊ नये असे आदेश दिलेले असतानाही बीड पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांनी लोळदगाव येथील सहशिक्षिका चांदणी सरवदे यांना एका दिवसात नेकनूर केंद्र अंतर्गत दस्तगीर वस्तीवर प्रतिनियुक्ती दिली. विशेष म्हणजे लोळदगावच्या शाळेत आठ वर्ग असताना सहाच शिक्षक आहेत. त्यातील एक जण दहावीच्या परीक्षेसाठी प्रतिनियुक्तीवर आहे. आणि याच काळात या शिक्षिकेची बदली केल्याने आता या गावात फक्त चार शिक्षक शिल्लक राहिले. चार शिक्षकाने आठ वर्ग कसे सांभाळायचे? हा मोठा प्रश्न असल्याने लोळदगावचे ग्रामस्थ संतप्त झाले असून त्यांनी या प्रतिनिधीच्या विरोधात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. लोळदगाव येथे आठवीपर्यंत शाळा आहे या ठिकाणी सहा शिक्षक कार्यरत होते आठ वर्गासाठी सहा शिक्षक असूनही शाळा चालू होती. या ठिकाणी दोन शिक्षकांची कमतरता असतानाही या शाळेतील एका शिक्षकाला दहावीच्या परीक्षेसाठी पाठवले. त्यामुळे पाच शिक्षक शिल्लक राहिले. अशा परिस्थितीतही प्रतिनियुक्त्या देऊ नयेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान यांचे आदेश असतानाही बीडच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी कुर्ला येथील केंद्रप्रमुख तसेच लोळदगावचे मुख्याध्यापकांना कल्पना न देता, या ठिकाणच्या सहशिक्षिका चांदणी सरवदे यांची एकाच दिवसात सर्व प्रक्रिया पूर्ण करून तडकाफडकी नेकनूर केंद्रांतर्गत असलेल्या दस्तगीर वस्ती शाळेवर प्रतिनियुक्ती दिली. त्यामुळे लोळदगाव येथील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून या ठिकाणचे ग्रामस्थ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करून तीव्र आंदोलन छेडणार आहेत. ही प्रतिनिधी तात्काळ रद्द केली नाही तर उपोषणाचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

### लोळदगावच्या शिक्षिका दस्तगीर वस्तीवर; लोळदगावकर आंदोलनाच्या तयारीत

# काळेगाव हवेली जि.प.शाळेत शिवजयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेगाव हवेली या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध कार्यक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास राऊत हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन सरपंच श्रीमती वंदना भारत कानडे, उपसरपंच बाळकृष्ण पवार, युवा उद्योजक अण्णासाहेब डोके, दत्ता पवार, सर्जेराव पवार, संतोष पवार ,अंकुश पवार ,निवास बापू येळे ,जगन्नाथ पवार दीपक डोके आदी उपस्थित होते. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मुलांची भाषणे झाली. भाषणाच्या कार्यक्रमानंतर संस्कृती कार्यक्रमात एक ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय उत्कृष्ट असा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभंग सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती जाधव मॅडम, उबाळे मॅडम ,खेत्रे मॅडम ,झांबरे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक एम. डी.अभंग यांनी मानले.



# वाघोरा येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा गावी शिवजन्मोत्सव मोठ्या आनंद उत्साहात १९ फेब्रुवारी गुरुवार रोजी साजरा करण्यात आला.

पहाट बसून घरासमोर सडा रांगोळी काढून लहान बालके, तरुण, स्त्री- पुरुष, वयोवृद्ध सुद्धा मोठ्या उत्साहात होते. राजमाता जिजाऊ मासाहेब, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अनेक मावळे यांच्या वेशभूषा साकारलेले विद्यार्थी पण तयार होऊन श्री राम मंदिरा समोर सकाळी आठ वाजल्यापासून शिवरायांच्या पालखीसह मिरवणुकीला सुरुवात झाली. सर्वात समोर ढोल ताशाचा गजर होता,शिवरायांची पालखी, वेशभूषा साकारलेले छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ मासाहेब घोड्यावर बसून मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होते. मावळ्यांच्या वेशभूषा विद्यार्थी शिवबा राजा बसला घोड्यावरी या गीतावर लेझीम सादर करत होते. माता पालक गावकरी विद्यार्थी सोबत तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ! जय शिवराय! अशा घोषणा देत गावातून मिरवणूक काढण्यात आली. गावातील मुख्य ठिकाणी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी भव्य स्मारक उभरण्यात आले. शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात अभिवादन करण्यासाठी गर्दी केली.गावात घराघरावर भगवा ध्वज फडकत होते. वाघोरा जिल्हा परिषद शाळेत मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या ◀◀ पान ३ वर

# सलग दोन दिवस जीवघेणा हल्ला प्रमुख आरोपी ४८ तासांत अटकेत

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सहयोगनगर भागात एका वृद्ध इसमावर हल्ला करणारा प्रमुख आरोपी पोलिसांनी ४८ तासात ताब्यात घेतला. ही कारवाई बीड शहर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी केली. दिनांक १५ रोजी सकाळी सुमारे १०:३० वाजण्याच्या सुमारास मोबाईल फोनवरून एका अज्ञात व्यक्तीने माहिती दिली की, सहयोग नगर परिसरातील सर्वेश्वर मंदिराजवळ चार महिला व एका पुरुषाने एका व्यक्तीस बेदम मारहाण करून जखमी केले आहे. सदर माहिती मिळताच संदीप नेवरे व महेश जाधव हे तात्काळ पेट्रोलिंग वाहनासह घटनास्थळी रवाना झाले. तपासादरम्यान समोर आले की, पीडित सदाशिव धोंडिबा कोकाट (रा. पांडुरंग ◀◀ पान ३ वर



# उद्या हरीश कुलकर्णी यांचे गायन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा उद्या रविवार २२ फेब्रुवारी ला होणार असून या सभेत लातुर येथील प्रख्यात गायक हरीश कुलकर्णी यांचे स्वतंत्र गायन होणार आहे संवादिनीवर विश्वजित धाट हे तर जयप्रकाश हरिदास तबल्यावर साथसंगत करतील.



बालगंधर्व संगीत महाविद्यालयाच्या वतीने स्नेहा शिनगारे व रूपेश जाधव यांना सर्वोत्तम पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आदर्श वसाहत भागातील कपिल गणेश मंदीर येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सहकारी बँकेला कोटींचा गंडा!

## ९१ लाखांचे सोने निघाले चक्क 'बनावट'; व्हॅल्युएअरसह ४२ जण पसार




बिबवेवाडी

एका बहुराज्य सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये तब्बल ९१ लाख रुपयांच्या बनावट सोनेतारण कर्ज घोटाळ्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४१ कर्ज प्रकरणांत तारण ठेवलेले सोने फेरतपासणीत पूर्णपणे खोटे असल्याचे निष्पन्न झाल्याने बँक प्रशासनात खळबळ उडाली आहे.या प्रकरणी संबंधित कर्जदार आणि तत्कालीन गोल्ड व्हॅल्युएटर अजित प्रभाकर कुलकर्णी यांच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी बँकेची तब्बल ९१ लाखांची फसणूक झाली आहे. गोल्ड व्हॅल्युअर कुलकर्णी मोबाइल बंद ठेऊन, कार्यालयाला व घराला कुलूप लावून पळून गेला आहे.

पोलिसांनी सांगितले की, कल्याण जनता सहकारी बँकेचे उप व्यवस्थापक निलेश देशमुख (५०, रा.अमनोरा टॉवर) यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली होती, त्यानूसार वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात व्हॅल्यूअरसह तब्बल ४२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. ही फसवणूक दि. २६ ऑक्टोबर २०२० ते ३० जून २०२१ या कालावधीत वारजे आणि बिबवेवाडी शाखांमध्ये झाली आहे.येथून एकूण ४१ ग्राहकांनी सोनेतारण कर्ज घेतले होते. बँकेच्या नोंदीनुसार सर्व ग्राहकांनी बचत खाती उघडून आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. गोल्ड व्हॅल्युएटर अजित कुलकर्णी यांनी दागिन्यांची शुद्धता व वजन तपासून प्रमाणपत्र दिले होते. त्यावर विश्वास ठेवून बँकेने वार्षिक ८.५% व्याजदराने कर्ज मंजूर केले. एकूण ९१ लाख रुपये कर्ज वितरित करण्यात आले. प्रारंभी काही महिन्यांपर्यंत कर्जदारांनी व्याजाची रक्कम भरली. मात्र, त्यानंतर परतफेड थांबली. परिणामी सर्व खाती अनुत्पादक कर्ज घोषित करण्यात आली. कर्जदारांशी संपर्क साधूनही प्रतिसाद न मिळाल्याने आणि गोल्ड व्हॅल्युएटरचा मोबाइल बंद असल्याने बँकेला संशय आला. संबंधित व्हॅल्युएटर त्यांच्या निवासस्थानी व कार्यालयात उपलब्ध नसल्याचेही स्पष्ट झाले. दरम्यान दि. ६ व ७ ऑगस्ट २०२५ रोजी बँकेने नव्याने नियुक्त गोल्ड व्हॅल्युएटर विवेक एकनाथ डहाळे (प्रथमेश ज्वेलर्स) यांच्या उपस्थितीत, वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आणि पंचांसमक्ष सर्व सिलबंद पाकिटांची सीसीटीव्ही रेकॉर्डिंगसह फेरतपासणी केली असता तारण ठेवलेले सर्व दागिने बनावट होते. त्यांची बाजारमूल्य शून्य असल्याचा अहवाल सादर करण्यात आला.




# शाळेत सोडण्याच्या बहाण्याने मुलीवर लैंगिक अत्याचार

## वारजे माळवाडी पोलिसांकडून एकाविरुद्ध गुन्हा

पुणे

शाळेत सोडण्याची बतावणी करुन अल्पवयीन मुलीवर मोटारीत बलात्कार करण्याची धक्कायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीतील आहे.ज्ञानेश्वर सुरेश रायरीकर (वय २९, रा. पोळ कॉलनी, आपटे सोसायटी रस्ता, वारजे माळवाडी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीचा आहे. त्याची पीडित मुलीच्या आईशी ओळख होती.

१८ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणेसातच्या सुमारास अल्पवयीन मुलीला मोटारीतून शाळेत सोडतो, असे सांगून तिला आरोपीने नेले. कर्वेनगर भागातील डीपी रस्त्यावर त्याने मोटार थांबविली. मोटारीत त्याने मुलीला धमकावून बलात्कार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास त्याने मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या मुलीने याबाबतची माहिती आईला दिली. त्यानंतर आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस आयुक्त सुजाता तानवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक तरडे तपास करत आहेत.

# पुण्यात रमजानला उत्साहात सुरुवात



पुणे

मुस्लीम समाजबांधवांनी एकत्र येऊन केलेले नमाजपठण... दिवसभर केलेला रोजा (उपवास)... सायंकाळनंतर रोजा इफ्तार अन घरोघरी संचारलेला आनंद... असे उत्साही आणि आनंदी वातावरण रमजानच्या निमित्ताने शहर आणि उपनगरांत पाहायला मिळाले. पवित्र रमजानच्या महिन्याला गुरुवारपासून (दि. १९) उत्साहात सुरुवात झाली. मुस्लीम समाजबांधवांनी दिवसभर रोजा केला अन नमाजपठणही केले. सकाळपासून घरांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. मुस्लीमबांधवांनी मशिदीमध्ये सामुदायिक नमाजपठण केले, तर काहींनी घरातच नमाजपठण केले. रमजानच्या निमित्ताने शुक्रवार पेठ, कॅम्प परिसर, रविवार पेठ, कोंढवा आदी ठिकाणी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावायलाही सुरुवात झाली.

मुस्लीमधर्मीयांमध्ये 'रमजान'च्या महिन्याला विशेष महत्त्व आहे. मनातील कटुता विसरून परस्परांमध्ये आपुलकी, स्नेहभाव, संयम, त्याग, शांती, सहिष्णुता वाढावी याची शिकवण देणारा हा महिना आहे. संपूर्ण महिनाभर अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने कडकडीत रोजे, पाच वेळा नियमितपणे नमाजपठण केले जाते. पहाटे सेहरी, दिवसभर रोजा, नमाजपठण आणि सायकाळनंतर रोजा इफ्तार करण्यात आला.

मशिदींमध्येही मुस्लीम समाजबांधवांनी एकत्र येऊन नमाजपठण केले. रमजानच्या पवित्र महिन्याला सुरुवात झाल्याने सेहरी आणि रोजा इफ्तारसाठी आवश्यक असलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्स ठिकठिकाणी लावण्यात येत आहेत. खजूरसह सरबत, सुका मेवा आदी पदार्थांचे स्टॉल्स शुक्रवार पेठ, कॅम्प परिसर, रविवार पेठ, कोंढवा आदी ठिकाणी लावण्यात येत असून, काही ठिकाणी खाद्यपदार्थांच्या खरेदीला गुरुवारपासून सुरुवात झाली.

# गुजरातमध्ये भीषण अपघात

## पुण्यातील तीन जीवलग मित्रांचा जागीच मृत्यू



पुणे

पुण्यातून बारा ज्योतिर्लिंग दर्शनासाठी गेलेल्या तीन तरुणांचा गुजरातमध्ये दाहोद जिल्ह्यातील लिमखेडा तालुक्यातील धाधेला वळणावर सोमवार (ता.१६) रोजी पहाटे २ च्या सुमारास रस्ता अपघातात मृत्यू झाला. तेजस दगडे, अभिषेक यादव आणि सचिन बिराजदार असे तिघांची नाव आहे. तीन जीवलग मित्रांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्र नोंदणीकृत एसयूव्ही गाडी नियंत्रण गमावून महामार्गाच्या दुभाजकावर आदळली. या धडकेत गाडीचा चुरडा झाला. कारचे इंजिन ५० फूट दूर फेकले गेले. एसयूव्ही रस्त्यावरून उलटून जवळच्या शेतात २० फूट खोलवर कोसळली. यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तिघेही १५ दिवसांपूर्वी बारा ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी गेले होते. खासगी गाडीने ते या प्रवासासाठी गेले असताना हा अपघात झाला. तेजस दगडे हा मांजरी परिसरातील रहिवासी होता. शेतीबरोबरच त्याचे कार्यालयाचा व्यवसाय होता. सोमवारी त्याच्या अपघाताची बातमी गुजरात पोलिसांकडून तेजसच्या घरच्यांना समजली. त्यानंतर त्यांनी लागलीची गुजरातकडे धाव घेतली. तेजसवर बुधवारी मांजरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पॅरिसच्या मुख्य चौकात जय शिवरायचा जयघोष!

## युरोप दौऱ्यावर गेलेल्या ५२ शेतकऱ्यांनी सातासमुद्रापार साजरी केली शिवजयंती



मंचर

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत आयोजित परदेश अभ्यास दौऱ्यांतर्गत युरोप दौऱ्यावर गेलेल्या ५२ शेतकऱ्यांनी पॅरिस येथे गुरुवारी (ता.१९) मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली. फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरिसच्या मुख्य चौकात 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि हा अनोखा सोहळा उपस्थितांचे लक्ष वेधून घेतला.

संगमनेर येथील शिवभक्त संतोष डोंगरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो सोबत आणला होता. पॅरिसच्या प्रमुख चौकामध्ये शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, प्रगतशील शेतकरी विजया अंबाडे, संतोष डोंगरे, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी तसेच आंबेगाव तालुक्यातील शेतकरी ऋषिकेश गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारताचा तिरंगा ध्वज शिवरायांच्या प्रतिमेमागे लावण्यात आला होता.यावेळी बोलताना बोराळे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे शेतकऱ्यांचा सार्थ अभिमान आहेत. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी शेतकऱ्यांना संरक्षण व प्रोत्साहन दिले. आज सात समुद्रापार पॅरिसमध्ये शिवजयंती साजरी करताना आम्हाला अभिमानासह आनंद होत आहे. पॅरिसमध्ये शिवजयंती साजरी करण्याची संधी मिळाल्याबद्दल शेतकऱ्यांनी कृषी विभागाचे आभार मानले. हा प्रसंग आमच्या कायमस्वरूपी स्मरणात राहील, असे ऋषिकेश गावडे यांनी सांगितले. या दौऱ्यात अशोक दरेकर (नारायणगाव), निलेश धपाटे, संभाजी नरुटे, दीपक गलांडे, शिवाजी तरंगे (सर्व इंदापूर) तसेच संतोष डोंगरे (संगमनेर) यांच्यासह अन्य शेतकरी सहभागी झाले आहेत.

# कात्रज डेअरी चौकात भीषण अपघात

## डंपरच्या चाकाखाली चिरडून महिलेचा जागीच मृत्यू



पुणे

पुण्यातील कात्रज डेअरी चौक परिसरात एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुपिटर मोटार मोपेड (क्र. त्र्ा ०१ झन १३७४) वरून जात असताना संबंधित महिलेला एमएच १२ वाय क्यू ७२५९ क्रमांकाच्या हायवा डंपरने जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील महिला डंपरच्या पाठीमागील टायरखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव प्ररिमा प्रधान (वय-३८) असून त्या कात्रज कोंढवा रोड येथील श्रीज्वेल सोसायटीमध्ये वास्तव्यास होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत हायवा डंपर चालकाला ताब्यात घेतले आहे. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. दरम्यान, मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी ससून हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे. अपघाताचे नेमके कारण समजण्यासाठी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# पोलीस अधिकाऱ्याने मागितली ३५ हजारांची लाच

## पुण्यातील पौडमध्ये रंगेहात पकडलं



पुणे

पुण्यातील पौड पोलीस स्टेशनच्या एएसआयला लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. सचिन शिंदे असं या लाचखोर एएसआयचं नाव आहे. ३५ हजारांची लाच घेताना अँटी करप्शन ब्युरोने सापळा रचून सचिन शिंदेला बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान, या घटनेमुळं पौड परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस अधिकारीच लाच घेत असेल तर न्याय मागायचा कोणाकडे असा सवाल नागरिक करत आहेत.

एका अपघातानंतर दोन वाहनांनातील व्यक्तींमध्ये मारहाण झाली होती. याप्रकरणात गाडी जमा करुन न घेणे, अटक करुन न घेणे आणि इतर कायदेशीर कारवाईत मदत करणे यासाठी ही लाच मागितली होती. तक्रारदाराने यासंबंधी एसीबीकडे तक्रार केली होती. या तक्रारीची शहानिशा करुन एसीबीने आज सापळा रचला, ज्यात सचिन शिंदे अडकला. ३५ हजारांची लाच घेताना अँटी करप्शन ब्युरोने सापळा रचून सचिन शिंदेला बेड्या ठोकल्या आहेत.


# मुलीची बाजू घेतल्यामुळे माझ्याबद्दल गैरसमज

## भिगवण प्रकरणात राहुल कुल यांची एंट्री

भिगवण

जिल्ह्यातील भिगवण कथित अपहरण प्रकरणावरुन आता राजकारण रंगत असल्याचं पाहायला मिळत आहे. अपहरण करण्यात आल्याचा आरोप केल्यानंतर मुलीने आपण स्वत:हून मुलासोबत आल्याचं सांगितलं आहे. विशेष म्हणजे आज मध्यरात्री मुलगी आणि मुलगा दोघेही पोलीस स्टेशनमध्ये हजर झाले असून पोलिसांनी मुलीचा जबाब नोंदवला आहे. त्यामध्येही मुलीने आपण मर्जीने पळून गेलो असून अपहरण झालं नसल्याचं सांगितलं. मात्र, याप्रकरणावरुन राजकीय वातावरण तापलं असून आमदार राहुल कुल (ठर्हीश्र घींश्र) यांच्या भूमिकेवर प्रश्न विचारले जात आहेत. आता, याप्रकरणी आमदार कुल यांनी आपली बाजू मांडली. ज्यावेळेस गुन्हा घडला, त्यावेळी मी मुलीच्या नातेवाईकांच्या संपर्कात होतो. मुलीचा शोध घेईपर्यंत मी पोलीस प्रशासनाच्या संपर्कात होतो. माझ्यावर जे आरोप झाले, पण मलाही एक मुलगी आहे, माझ्या घरात महिला पदाधिकारी आहेत.

मुलीची बाजू घेतल्यामुळे माझ्याबद्दल गैरसमज पसरवले जातात. याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्यात यावी, आधी वस्तुस्थिती तपासावी आणि मग आरोप करावे, असे म्हणत आपल्यावर राजकीय हेतुने आरोप होत असल्याचे राहुल कुल यांनी सूचवले आहे. माझी नि:पक्षपाती भूमिका असल्यामुळे काही लोक दुखावले गेले असतील. त्यामुळे, याप्रकरणाला राजकीय वळण दिले जात आहे. गुन्हेगार कोण आहेत, मी त्यांना ओळखत नाही. कुणी कुणाचं स्टेटस ठेवावे आणि आरोप करावे त्याच्याशी माझा कोणताही संबंध नाही. माझे सगळे रेकॉर्डिंग काढावे, मी मला आलेले सगळे फोन



घेतो. जे दोषी आहेत, त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी प्रतिक्रिया आमदार राहुल कुल यांनी दिलीय. मुलीच्या कुटुंबियांच्या मी संपर्कात आहे, मी भेटून त्यांना मदत करेल, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. दरम्यान, अझर शेख याला आमदार राहुल कुल यांचा पाठिंबा असल्याचे मुलीच्या आईने म्हटलं आहे. त्यांच्या दबावाखाली माझी मुलगी गेली आहे, हिंदू समाजाने जागं झालं पाहिजे, असे म्हणत याप्रकरणात मंत्री तथा इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी लक्ष घालावं, अशी देखील मागणी या महिलेने केली आहे. तर, व्हॉट्सअप स्टेटस ठेवणारा अझर शेख हा मुलीच्या प्रियकराचा चुलता आहे. अझर शेख हा राहुल कुल यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप मुलीच्या नातेवाईकांचा आहे.दरम्यान, गेल्या १ वर्षापासून असलेल्या प्रेमसंबंधामुळे आमचा एकमेकांवर विश्वास असल्याने आई व भावाची नजर चुकवून मी प्रियकरासोबत निघून गेली होती, या पुढील आयुष्य मी त्याच्यासोबतच राहणार आहे, असे प्रतिज्ञापत्र मुलीने लिहून दिले आहे. मुलगा व मुलीने आजच मध्यरात्री पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली होती.

# महामार्गावर सापळा रचून अवैध दारू वाहतुकीवर धडक कारवाई

पुणे

राष्ट्रीय महामार्गावर बेकायदा दारू वाहतुकीला आळा घालण्यासाठी तळबीड पोलिसांनी तासवडे फाट्यावर सापळा रचून कारवाई केली. त्यात महामार्गावरून संशयित हालचाली करणाऱ्या दुचाकीची तपासणी केली असता सुमारे १९ हजार ४०० रुपये किमतीचा विदेशी दारूचा साठा जप्त केला. या कारवाईत एका युवकाला ताब्यात घेण्यात आले असून, दारूचा साठा व वाहन असा मुद्देमाल जप्त केला. वैभव सुखदेव कोरडे (वय २५, रा. गजानन हाउसिंग सोसायटी, गोवारे, ता. कऱ्हाड, जि. सातारा) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे. पोलिस प्रवीण गायकवाड यांनी याबाबतची फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पुणे– बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरून अवैधरीत्या दारू वाहतूक सुरू असल्याचे समजले. या वेळी पोलिसांनी तासवडे फाट्यावर सापळा रचला. त्यावेळी संशयित तरुण हा त्यांच्याकडील दुचाकीवरून (एमएच ३० डी १२८९) परवानगीशिवाय विदेशी दारूविक्रीच्या उद्देशाने वाहतूक करताना आढळून आला. यावेळी त्याच्याकडून पोलिसांनी सुमारे १९ हजार ४०० किमतीचा विदेशी दारूचा साठा जप्त केला, तसेच सुमारे ३० हजार किमतीची दुचाकी देखील जप्त केली आहे.

या प्रकरणी तळबीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र भोरे, उपनिरीक्षक प्रशांत पाटील, आनंदा रजपूत, हवालदार योगेश भोसले, आप्पा ओंबसे, कुलदीप कोळी, प्रवीण गायकवाड, सुशांत कुंभार, अभय मोरे, मारुती बाकले यांनी ही कारवाई केली. उपनिरीक्षक दिनकर काळे तपास करीत आहेत.